दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २९९ I बुधवार १२ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# शिवसेना 'पक्षफुटी'वरून घमासान

## निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उबाठा गटाचे आव्हान

### केवळ आमदारांचा गट फुटला म्हणजे राजकीय पक्ष फुटला असे होत नाही; कपिल सिब्बल यांचा सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** शिवसेनेचे नाव, पक्षाची ओळख आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्हावरून सुरू असलेल्या कायदेशीर संघर्षाला आता निर्णायक वळण मिळाले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उबाठा) गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आव्हानावर सुरू असलेल्या अंतिम सुनावणीत मंगळवारी ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी 'राजकीय पक्ष' आणि 'विधिमंडळ पक्ष' या दोन स्वतंत्र संस्था असल्याचा मूलभूत मुद्दा मांडत आयोगाच्या निर्णयाच्या आधारालाच आव्हान दिले.

केवळ विधानसभा सदस्यांचा एखादा गट वेगळा झाला म्हणून मूळ राजकीय पक्षात फूट पडली, असा निष्कर्ष काढता येणार नाही. आधी राजकीय पक्षात प्रत्यक्ष फूट पडल्याचे सिद्ध होणे आवश्यक आहे आणि त्यानंतरच विधिमंडळातील स्वतंत्र गटाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो, असा ठाम युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

सरन्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या प्रकरणाची अंतिम सुनावणी सुरू आहे. न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांचा खंडपीठात समावेश आहे. मंगळवारी सुनावणीच्या तिसऱ्या दिवशी सिब्बल यांनी उबाठा गटाच्या वतीने आपली बाजू मांडली. या प्रकरणातील पुढील सुनावणी बुधवारीही सुरू राहणार आहे.



सिब्बल यांच्या मते, आमदारांचा वेगळा गट निर्माण होणे ही राजकीय पक्षाच्या संघटनात्मक अस्तित्वापासून स्वतंत्र बाब आहे. त्यामुळे विधिमंडळातील संख्याबळाच्या आधारेच कोणता गट मूळ पक्ष आहे, हे ठरविण्याच्या दृष्टिकोनावर पुनर्विचार आवश्यक आहे.

निवडणूक आयोगाने स्वतंत्र बैठका, नेत्यांच्या नियुक्त्या, मुख्य प्रतोदाशी संबंधित कागदपत्रे तसेच अपात्रतेच्या कार्यवाहीशी निगडित बाबींचा आधार घेत शिंदे गटाला मूळ शिवसेना मानले आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह बहाल केले होते. मात्र, अधिकारक्षेत्र निश्चित करण्यासाठी वापरलेला आधारच चुकीचा असेल, तर त्यावर आधारित अंतिम निर्णयही टिकू शकत नाही, असा दावा उबाठा गटाने केला आहे.

उद्धव ठाकरे गटाने २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दोन याचिकांमधून निवडणूक आयोगाच्या १७ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. सुनावणीदरम्यान शिवसेनेच्या २०१८ च्या पक्षघटनेचा मुद्दाही महत्त्वाचा ठरला. (पान ४ वर)

#### 'नाव-चिन्हा'पलीकडील लढाई

शिवसेना वादातील सर्वोच्च न्यायालयाची सुनावणी आता केवळ 'शिवसेना' हे नाव किंवा 'धनुष्यबाण' चिन्ह कोणत्या गटाचे, या प्रश्नापुरती राहिलेली नाही. राजकीय पक्षाचे संघटनात्मक अस्तित्व नेमके कशावर ठरते, विधिमंडळातील संख्याबळाला किती महत्त्व आहे आणि पक्षांतर्गत संघर्षात निवडणूक आयोगाच्या अधिकारांची घटनात्मक मर्यादा काय आहे, या व्यापक प्रश्नांची उत्तरेही या निकालातून अपेक्षित आहेत.

#### 'विधिमंडळ पक्ष' म्हणजेच 'राजकीय पक्ष' नव्हे

शिवसेनेतील फुटीनंतर आमदारांचा एक गट वेगळा झाला. मात्र, त्या आधारावरच राजकीय पक्षात फूट पडल्याचे मानणे योग्य नाही, असा सिब्बल यांच्या युक्तिवादाचा केंद्रबिंदू होता. संविधानाच्या दहाव्या अनुसूचीतील जुन्या तरतुदींचा तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निकालांचा दाखला देत त्यांनी राजकीय पक्ष आणि त्याचा विधिमंडळ पक्ष यांच्यातील घटनात्मक फरक अधोरेखित केला.

# 'जन-गण-मन' ऐवजी 'वंदे मातरम्' प्रथम गायले जाणार!

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंची विधेयकाला मंजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'चा अवमान करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे.




संसदेने गेल्या महिन्यात 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करणारे हे महत्त्वपूर्ण विधेयक बहुमताने मंजूर केले होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असून संपूर्ण देशात हा नियम लागू झाला आहे.

नवीन कायद्यानुसार, 'वंदे मातरम'चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास: जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान १ वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

याआधी १९७१ च्या मूळ कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन गण मन'च्या अवमानाबाबतच शिक्षेची तरतूद होती. 'वंदे मातरम'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा असूनही असा कोणताही थेट कायदेशीर आधार उपलब्ध नव्हता. हीच त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कलम ३ मध्ये सुधारणा करून 'वंदे मातरम'चा यामध्ये समावेश केला आहे. या विधेयकात २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बंकीमचंद्र चॅटर्जी लिखित 'वंदे मातरम' या गीताने अतुलनीय योगदान दिले होते. म्हणूनच, 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'सारखाच दर्जा आणि सन्मान दिला गेला पाहिजे, अशी भूमिका घटना समितीने मांडली होती. कायद्यातील या सुधारणेमुळे घटना समितीच्या भूमिकेला आज कायदेशीर बळ मिळाले आहे.

#### गृह मंत्रालयाचे महत्त्वाचे निर्देश आणि नवीन नियमावली

- गृह मंत्रालयाने याआधीच 'वंदे मातरम'च्या गायनासंदर्भात एक विस्तृत नियमावली (प्रोटोकॉल) जारी केली आहे. लाल किल्ल्यावरून प्रथमच गायन: यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनी पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून 'वंदे मातरम'चे गायन केले जाणार आहे.
- **६ कडवी आणि वेळ:** अधिकृत कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम'ची सर्व ६ कडवी गायली जातील. यासाठी ३ मिनिटे १० सेकंदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.
- **प्राधान्यक्रम :** कोणत्याही शासकीय कार्यक्रमात राष्ट्रगीत (जन-गण-मन) आणि राष्ट्रीय गीत एकत्र वाजवले किंवा गायले जाणार असल्यास, 'वंदे मातरम' प्रथम गायले जाईल.
- **आदर आणि शिस्त :** राष्ट्रीय गीत सुरू असताना उपस्थितांना सावधान स्थितीत उभेराहणे बंधनकारक असेल. शाळांमध्ये सुरुवात: देशातील सर्व शाळांमध्ये दैनंदिन कामकाजाची सुरुवात 'वंदे मातरम'च्या समूहगायनाने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## महत्त्वाचे..

### अण्णासाहेब पाटील महामंडळाचे एमडी विजयसिंह देशमुख यांची तडकाफडकी बदली

**मुंबई :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांची तडकाफडकी उचलबांगडी करण्यात आली आहे. महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी मराठा समाजातील तरुण उद्योजकांच्या तीव्र नाराजीची आणि तक्रारींची दखल घेत मुख्यमंत्र्यांकडे केलेली मागणी अखेर मान्य झाली आहे. विजयसिंह देशमुख यांच्या जागी आता राज्य सरकारने अविनाश रणखांब यांची नवीन एमडी म्हणून नियुक्ती केली आहे. अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या अनेक मराठा तरुणांचे मंजूर झालेले 'क्रेडिट लिंक्ड सबसिडी' किंवा कर्ज मंजुरीचे एलओआय अचानक रद्द केले जात होते. त्यामुळे तरुण उद्योजकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता.

## क्रेटा-स्कुटीची भीषण धडक : तरुणाचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा-लिंपणगाव रस्त्यावर होलेवाडी नजीक क्रेटा कार आणि स्कुटीची जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात प्रशांत शिंदे (रा. टाकळी लोणार, ता. श्रीगोंदा) यांचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी घडलेल्या या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, क्रेटा कार (क्र. एमएच १६ सीव्ही ७१७२ ) आणि स्कुटी (क्र. एमएच १२ डब्ल्यूओ ०३८९ ) यांच्यात होलेवाडी नजीक अपघात झाला.




धडक एवढी जोरदार होती की, स्कुटीस्वार प्रशांत शिंदे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दरम्यान, अपघातानंतर क्रेटा वाहन घटनास्थळी असताना त्याचा चालक अथवा मालक घटनास्थळावरून निघून गेल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे अपघातानंतर चालकाने घटनास्थळ का सोडले, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अपघाताची माहिती घेत पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून अपघाताचे नेमके कारण आणि चालकाची भूमिका तपासानंतर स्पष्ट होणार आहे. पसार झालेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.या दुर्दैवी घटनेमुळे टाकळी लोणार परिसरात शोककळा पसरली आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यातून तरुण शेतकरी बचावला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द शिवारात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याची दहशत कायम आहे. मंगळवारी सकाळी चारा कापण्यासाठी शेतात गेलेल्या तरुण शेतकऱ्यावर बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात अमोल दिनकर घोगरे हे बालंबाल बचावले. मात्र, बिबट्याच्या तीक्ष्ण नखांमुळे त्यांच्या कपाळावर आणि पोटावर जखमा झाल्या आहेत.



कोल्हार खुर्द येथील घोगरे वस्ती परिसरात सकाळी साडेआठच्या सुमारास अमोल घोगरे हे जनावरांसाठी चारा कापण्यासाठी शेतात गेले होते. यावेळी गिन्नी गवताच्या गबतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली.

बिबट्याने हल्ला करताच घोगरे यांनी प्रसंगावधान राखत स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने ते बिबट्याच्या तावडीतून बचावले. मात्र, या हल्ल्यात त्यांच्या कपाळावर आणि पोटावर बिबट्याच्या तीक्ष्ण नखांनी ओरखडे व जखमा झाल्या.

गेल्या काही दिवसांपासून कोल्हार खुर्द शिवारात बिबट्याचा वावर वाढल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. या परिसरात बिबट्याने अनेक वेळा दर्शन दिले असून, यापूर्वी कुत्रे, पाळीव शेळ्या तसेच कालवडी बिबट्याच्या भक्ष्यस्थानी पडल्या आहेत. त्यामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे.

या घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने परिसराची पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे. बिबट्याचा वावर असलेल्या ठिकाणी पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, तसेच वनविभागाचे पथक तैनात करून त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी अनेक पाळीव प्राण्यांवर हल्ले झाले असून आता थेट तरुण शेतकऱ्यावर हल्ला झाला आहे. त्यामुळे बिबट्या आणखी आक्रमक होण्याची वाट न पाहता वनविभागाने तातडीने पिंजरा लावून त्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



## श्रीगोंद्यात गुटखा विक्रेत्यांवर तीन ठिकाणी छापे

### १ लाखाचा पानमसाला, सुगंधित तंबाखू जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहर व परिसरात अवैध गुटखा विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने जोरदार कारवाई करत तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत सहा आरोपींविरुद्ध तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, तब्बल १ लाख १० हजार ९७६ रुपये किमतीचा पानमसाला व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती घेऊन कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटखा विक्री करणाऱ्यांची माहिती संकलित केली.

दि. १० ऑगस्ट रोजी पथकाने पंचांसमक्ष तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. पहिल्या कारवाईत ६३ हजार १६ रुपयांचा, दुसऱ्या कारवाईत ३५ हजार ८६० रुपयांचा, तर तिसऱ्या कारवाईत १२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी स्वप्नील भिमराव कवडे, अमोल रामदास जाधव, बन्सी गंगाधर काळे, अल्ताफ गुलाब मुजावर व सलीम दिलावर पिरजादे यांच्यासह आरोपींविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात बीएनएसच्या संबंधित कलमान्वये तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील अमोल रामदास जाधव व सलीम दिलावर पिरजादे हे फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनांनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश लोंढे, अमोल कोतकर, मनोज साखरे, प्रताप देवकाते, सुनील मालणकर व बाळासाहेब गुंजाळ यांच्या पथकाने केली. स्थानिक गुन्हे शाखेने एकापाठोपाठ श्रीगोंदा तालुक्यात तीन ठिकाणी अवैध गुटखा पान मसाला विक्री करणाऱ्यांवर छापे टाकल्यामुळे अवैध व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# अर्थमंत्री सीतारामन यांचा 'डीपफेक' व्हिडीओ...

## पुण्यात व्यापाऱ्याला १ कोटी ७ लाखांचा गंडा

### एआय तंत्रज्ञानाचा गैरवापर; बनावट ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर ३ कोटी ९८ लाखांचा नफा दाखवला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार केलेला 'डीपफेक' व्हिडीओ सोशल मीडियावर दाखवून पुण्यातील एका व्यावसायिकाची तब्बल १ कोटी ७ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, बनावट ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर संबंधित व्यावसायिकाला तब्बल ३ कोटी ९८ लाख रुपयांचा नफा झाल्याचे भासवून




त्याचा विश्वास संपादन करण्यात आला. अशाच पद्धतीने यापूर्वी एका निवृत्त लष्करी अधिकाऱ्याचीही सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जून महिन्यात संबंधित व्यावसायिकाच्या इन्स्टाग्रामवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा व्हिडीओ असलेली एक जाहिरात आली. या व्हिडीओमध्ये त्या गुंतवणुकीच्या संधींबाबत माहिती देत असल्याचे भासत होते. व्हिडीओ हुबेहूब खरा वाटत असल्याने व्यावसायिकाने त्यामधील लिंकवर क्लिक केले. त्यानंतर एका कथित 'इन्व्हेस्टमेंट एक्झिक्युटिव्ह'ने त्याच्याशी संपर्क साधला.

सुरुवातीला संबंधित व्यक्तीला फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करून मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्याने काही हजार रुपये गुंतवल्यानंतर बनावट प्लॅटफॉर्मवर त्याच्या खात्यावर नफा झाल्याचे दाखवण्यात आले. त्याचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी त्याच्या खात्यात एक हजार रुपये प्रत्यक्ष जमा करण्यात आले. त्यामुळे संबंधित व्यावसायिकाचा या गुंतवणूक योजनेवर विश्वास बसला.

यानंतर सायबर भामट्यांनी इलॉन मस्क यांच्या (पान ४ वर)

#### प्रसिद्ध व्यक्तींचेही डीपफेक

सायबर गुन्हेगारांकडून केवळ राजकीय नेत्यांच्या चेहऱ्याचा वापर करून बनावट व्हिडीओ तयार केले जात नसून उद्योगजगत आणि अन्य क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींच्या प्रतिमा व आवाजाचाही गैरवापर केला जात असल्याचे समोर आले आहे. दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांच्या नावाचा आणि प्रतिमेचा वापर करूनही अशाच प्रकारे फसवणूक केल्याची प्रकरणे समोर आली आहेत.

#### 'मोठा परतावा' दिसला तर सावध व्हा!

सोशल मीडियावर एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचा गुंतवणुकीचा सल्ला देणारा व्हिडीओ दिसला, तरी त्यावर तातडीने विश्वास ठेवू नये. कमी कालावधीत मोठा परतावा मिळण्याचे आमिष, अनोळखी लिंक, व्हॉट्सअॅप किंवा फोनद्वारे होणारा गुंतवणुकीचा आग्रह आणि बनावट ट्रेडिंग अॅप किंवा वेबसाइट ही सायबर फसवणुकीची प्रमुख चिन्हे असू शकतात.

# महामार्ग मोकळे कराच; पण प्रवाशांचे प्रश्नही सोडवा !

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महामार्ग म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वेगाने पोहोचण्याचा मार्ग नव्हे; तो देशाच्या आर्थिक आणि सामाजिक गतिमानतेचा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे महामार्गाच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होऊ नये, हीच अपेक्षा. महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय महामार्गांच्या 'राइट ऑफ वे'मध्ये झालेली अनधिकृत बांधकामे, ढाबे, हॉटेल आणि दुकाने हटविण्याचे आदेश देऊन या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा विषयक निर्देशांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या निर्णयाचे स्वागतच करायला हवे. मात्र, कारवाई करताना नियमांची अंमलबजावणी जितकी कठोर असेल, तितकीच ती न्याय्य आणि पारदर्शक असणेही आवश्यक आहे.

महामार्गालगत उभी राहिलेली अनेक हॉटेल, ढाबे आणि दुकाने वर्षानुवर्षे प्रवाशांच्या गरजा भागवत आहेत. काही आस्थापनांनी विधिवत परवानग्या घेऊन व्यवसाय उभा केला आहे, तर अनेकांनी महामार्गासाठी राखीव असलेल्या जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय थाटला आहे. या दोन्ही प्रकारांकडे एकाच नजरेने पाहणे अन्यायकारक ठरेल. महामार्गालगत आहे म्हणून प्रत्येक ढाबा बेकायदा आणि परवानगी आहे म्हणून प्रत्येक बांधकाम सुरक्षित, अशीही सरसकट भूमिका घेता येणार नाही. संबंधित जमीन 'राइट ऑफ वे'मध्ये येते का, बांधकामाला कोणत्या परवानग्या आहेत, प्रवेशमार्ग सुरक्षित आहे का आणि वाहनतळाची व्यवस्था आहे का, याची वस्तुनिष्ठ तपासणी होणे गरजेचे आहे.

'राइट ऑफ वे' म्हणजे फक्त वाहनांची चाके फिरतात एवढीच जागा नाही. भविष्यातील महामार्ग विस्तार, सेवा रस्ते, जलनिस्सारण, वाहतूक व्यवस्थापन आणि अन्य पायाभूत सुविधांसाठी राखीव असलेला भूभागही त्यात येतो. या जागेवर अतिक्रमण झाले तर आज वाहतुकीला फारसा अडथळा जाणवत नसला, तरी उद्या रस्ता रुंदीकरणाच्या वेळी मोठी समस्या निर्माण होते. त्याहून गंभीर बाब म्हणजे महामार्गाच्या कडेला अनियोजितपणे उभ्या राहणाऱ्या आस्थापनांमुळे वाहनांना अचानक ब्रेक लावणे, रस्ता ओलांडणे, चुकीच्या दिशेने वळणे किंवा रस्त्याच्या कडेला पार्किंग करणे यांसारख्या धोकादायक हालचाली वाढतात.

याच कारणामुळे सर्वोच्च न्यायालयाने रस्ता सुरक्षेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्यास सुरुवात केली आहे. अपघातासाठी केवळ वाहनचालकाला दोष देऊन प्रश्न सुटत नाही. रस्त्याची रचना, पार्किंगची व्यवस्था, अनधिकृत प्रवेशमार्ग, अतिक्रमणे, प्रकाशयोजना, पादचारी सुरक्षा आणि महामार्गालगतच्या व्यावसायिक हालचाली या सर्व बाबींचा अपघातांशी संबंध असतो. त्यामुळे महामार्ग मोकळे करण्याचा निर्णय हा केवळ अतिक्रमणविरोधी मोहीम म्हणून न पाहता 'रस्ता सुरक्षा' अभियान म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल.

सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना आणि संबंधित प्रशासनाला निश्चित मुदत देऊन कारवाईचे आदेश दिले आहेत. ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, अशा कारवाईत सर्वात मोठा धोका असतो तो निवडक कारवाईचा. मोठ्या व्यावसायिक आस्थापनांकडे दुर्लक्ष करून छोट्या ढाबेवाल्यांवरच कारवाई झाली, तर निर्णयाच्या उद्देशालाच तडा जाईल. कोणते बांधकाम अनधिकृत आहे, कोणते अधिकृत आहे, कोणते 'राइट ऑफ वे'मध्ये येते आणि कोणते त्याबाहेर आहे, याची सार्वजनिक नोंद आणि स्पष्ट मोजणी प्रशासनाने उपलब्ध करून दिली पाहिजे. विशेषतः ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह महामार्गालगतच्या छोट्या व्यवसायांवर अवलंबून आहे. एखादे अतिक्रमण हटविणे आवश्यक असेल तर ते हटविलेच पाहिजे; परंतु कायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांना नोटीस, सुनावणी आणि अपीलाची संधी मिळाली पाहिजे. नियमबाह्य बांधकामांना संरक्षण मिळू नये आणि नियम पाळणाऱ्यांवर अन्यायही होऊ नये, हा सुवर्णमध्य साधणे प्रशासनासमोरचे खरे आव्हान आहे.

या निर्णयाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे पर्यायी व्यवस्था. महामार्गालगतचे ढाबे हटविले आणि अधिकृत विश्रांतीस्थळे, ट्रक पार्किंग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षित प्रवेश-निर्गमन मार्ग उपलब्ध करून दिले नाहीत, तर समस्या दुसऱ्या रूपात परत येईल. विशेषतः लांब पल्ल्याच्या ट्रकचालकांसाठी सुरक्षित पार्किंग ही मूलभूत गरज आहे. पार्किंगची सोय नसताना 'रस्त्याच्या कडेला वाहन उभे करू नका' असे सांगणे व्यवहार्य ठरणार नाही.४० मीटर आणि ७५ मीटरसारख्या अंतराच्या नियमांची अंमलबजावणी करतानाही स्थानिक परिस्थितीचा शास्त्रशुद्ध विचार आवश्यक आहे. नकाशावर आखलेली रेषा आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती यामध्ये अनेकदा फरक असतो. त्यामुळे आधुनिक सर्वेक्षण, डिजिटल नकाशे आणि स्पष्ट सीमांकनाच्या आधारे कारवाई झाली पाहिजे. अन्यथा वर्षानुवर्षे असलेले मालमत्तेचे वाद, न्यायालयीन प्रकरणे आणि प्रशासकीय गोंधळ वाढण्याची शक्यता आहे.महामार्गांवरील अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम ही केवळ बुलडोझर चालविण्याची मोहीम ठरू नये. ती नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्थेची सुरुवात ठरली पाहिजे. जिथे ढाबे हटविले जातील, तिथे अधिकृत सर्व्हिस एरिया उभारले जातील का? ट्रकचालकांसाठी सुरक्षित पार्किंग कुठे असेल? प्रवाशांना भोजन, स्वच्छतागृह आणि आपत्कालीन सेवा कुठे मिळतील? या प्रश्नांची उत्तरे सरकारने आधीच द्यायला हवीत.

महामार्ग मोकळे असणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही; ती प्रवाशांच्या जीविताशी संबंधित सामाजिक गरज आहे. अतिक्रमण करणाऱ्यांना कायद्याचा धाक आणि नियम पाळणाऱ्यांना कायद्याचा आधार मिळाला पाहिजे. रस्ते सुरक्षित झाले, वाहतूक सुरळीत झाली आणि प्रवाशांना नियोजित सुविधा मिळाल्या, तरच या निर्णयाचा खरा हेतू साध्य होईल. म्हणूनच महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे हटविण्याच्या निर्णयाला विरोध करण्याचे कारण नाही. उलट, तो कठोरपणे राबविला गेला पाहिजे. पण कारवाईच्या नावाखाली मनमानी होऊ नये, अधिकृत व्यवसायांवर अन्याय होऊ नये आणि प्रवाशांच्या मूलभूत गरजा दुर्लक्षित होऊ नयेत, याची काळजी सरकारने घ्यावी. महामार्ग केवळ मोकळे नकोत; ते सुरक्षित, शिस्तबद्ध आणि प्रवाशांसाठी सुविधायुक्तही झाले पाहिजेत. हाच या मोहिमेचा खरा कस आहे.

# मनपा कर्मचारी मृत्यूच्या निषेधार्थ नेवासा कडकडीत बंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगर महापालिकेचे खाजगी कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ हिंदुत्ववादी संघटनांनी मंगळवारी दि. ११ ऑगस्ट रोजी नेवासा बंदची हाक दिली होती. व्यापारी



व नागरिकांनी प्रतिसाद देत शहरात कडकडीत बंद पाळत सकाळी अकरा वाजता मळगंगा देवी मंदिरा पासून पायी मोर्चा काढण्यात येवुन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना निवेदन देण्यात आले. बंदच्या आवाहनानंतर प्रमुख बाजारपेठ व रस्ते दिवसभर जवळपास बंद होते कडकडीत बंद पाळण्यात आला.

बस स्थानक, गणपती चौक, नेवासा - श्रीरामपूर रस्याने मोर्चा तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आला असता. सकल हिंदू समाजाच्या वतीने ॲड.मयूर वाखुरे,नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,भाऊसाहेब वाघ, सुनील परदेशी,कृष्णा परदेशी, महेश मापारी, मनोज पारखे,माऊली पेचे,निरंजन डहाळे यांनी धीरज परदेशी यांच्या मृत्यूच्या घटनेचा संताप व्यक्त करत आरोपींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली.

सदर प्रकरण फास्ट ट्रॅक चालवून दोषींवर कठोर शिक्षा व्हावी, आरोपींना फरार होण्यास मदत करणाऱ्या तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करण्यात यावी, धीरज परदेशी यांच्या पत्नीला अनुकंपा तत्त्वावर महानगरपालिकेत तात्काळ रुजू करून घेण्यात यावे व कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी धीरज परदेशी यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. मोठ्या संख्येने सकल हिंदु समाज उपस्थित होता. बंदच्या पार्श्वभूमीवर प्रमुख चौक व संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## चांगदेव नगरातील शिवाजी महाराजांचा पुतळा सन्मानपूर्वक स्थापित करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** चांगदेव शुगर मिल्सच्या गोडाऊनमध्ये गेल्या दोन वर्षांपासून ठेवण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सन्मानपूर्वक स्थापित करण्यात यावा, अशी मागणी चांगदेव नगर युवा मंच व समस्त ग्रामस्थ पुणतांबा यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. पुतळ्याची लवकरात लवकर योग्य ठिकाणी सन्मानपूर्वक स्थापना करून परिसरातील नागरिकांची मागणी पूर्ण करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रश्नावर प्रशासनाकडून सकारात्मक तोडगा न निघाल्यास १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी सकल मराठा समाजाचे भास्कर मोटकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख आबासाहेब नळे, शिवसेनेचे अशोकराव गायकवाड, चांगदेव नगर युवा मंचचे संस्थापक पंकज नळे, अध्यक्ष दादासाहेब आग्रे, उपाध्यक्ष विकास गायकवाड, शिवस्मारक समितीचे सदस्य विकास जोगदंड, अमोल धनवटे, शौकत शहा, सर्जेराव जाधव व संतोष पवार आदी उपस्थित होते.

## माळवाडगाव शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रवींद्र आसने उपाध्यक्षपदी पत्रकार संदीप आसने

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रवींद्र बाळासाहेब आसने, तर उपाध्यक्षपदी पत्रकार संदीप सुभाष आसने यांची निवड करण्यात आली. शाळेत आयोजित पालक मेळाव्यात १७ सदस्यीय शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया पार पडली. उपसरपंच श्याम आसने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्यास माजी अध्यक्ष जालिंदर आसने, उद्धव शेळके तसेच न्यू इंग्लिश स्कूलचे उपाध्यक्ष सुनील आसने आदी उपस्थित होते.समितीच्या सदस्यपदी संदीप औटी, सुदाम आसने, दीपक आसने, दत्तात्रय दुशिंग, आदिनाथ चव्हाण, सुनील मोरे, सचिन उमाप, पूजा आसने, प्रमिला साळवे, सुरभी दांगट, सोनाली साळवे, शकीला पठाण, रेखा गुढेकर, नीता खाजेकर व दीपाली आसने यांची निवड झाली. यावेळी शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शाळेतील सुविधा याबाबत चर्चा करण्यात आली. पालक, शिक्षक व समितीमध्ये समन्वय वाढवून शाळेच्या विकासाला गती देण्याचा निर्धार करण्यात आला. पालक मेळाव्यास मोठी उपस्थिती होती.

# पंचगंगा उद्योग समूहाच्या वतीने साबुदाणा खिचडीचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** आषाढ वद्य कामिका एकादशी निमित्त धर्म व समाज कार्यात अग्रेसर असलेल्या पंचगंगा उद्योग समुहाच्या वतीने नेवासा येथे संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात हजारो भाविकांना सुमारे १२० क्विंटल शाबुदाना खिचडी महाप्रसादाचे वाटप उद्योजक शिवसेना नेते प्रभाकर शिंदे यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली करण्यात आले.





शाबुदाना खिचडी वाटप उपक्रम प्रसंगी श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य महंत देविदास महाराज म्हस्के शास्त्री, आ. विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले तसेच रत्नमालाताई लंघे यांच्या हस्ते खिचडी वाटपाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष प्रतापराजे चिंधे, विमा कंपनीचे अधिकारी किशोर गारुळे, गणेश लंघे, सतिषराव कर्डिले, पप्पू परदेशी, प्रशांत बहिरट, नामदेव ऐळवंडे, अनिल शेटे, सनी साळवे, सुरज शेटे, सचिन भांड, रामेश्वर गाडेकर,नेवासा नगरपंचायतचे नगरसेवक, पंचगंगा उद्योग समूहाचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच नेवासा तालुक्यातील भाविक भक्त, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलापूरात संत सावता महाराज सप्ताहाची सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बेलापूर येथील संत सावता मंदिरात आयोजित सप्ताहाची सवाद्य शोभायात्रा, काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सांगता झाली. सप्ताहादरम्यान विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पुण्यतिथीनिमित्त संत सावता महाराजांच्या प्रतिमेची गावातून सवाद्य शोभायात्रा काढण्यात आली. यात भाविक, महिला तसेच संत सावता महाराज मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. सप्ताहात ह. भ. प. मयूर महाराज बाजारे, डॉ. शुभम कांडेकर, विजय महाराज कुहिले, विश्वंभर महाराज शिंदे, बाबानंद महाराज व मोहन महाराज बेलापूरकर यांनी कीर्तनसेवा दिली.

संत सावता मंदिरात ह. भ. प. स्वामी रामानंद पुरी यांचे काल्याचे कीर्तन झाले. यावेळी स्व. गणपतराव टेकाडे व स्व. विलासनाना मेहेत्रे यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार, तर ह.भ.प. संजय महाराज शिरसाठ व कुटुंबीयांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.



शोभायात्रेनिमित्त आयोजित कलश सजावट स्पर्धेत सुनीता साळुंके यांनी प्रथम, तृप्ती छल्लारे यांनी द्वितीय, स्वानंदी खजिनदार यांनी तृतीय, तर मंगला महाले यांनी चतुर्थ क्रमांक मिळविला. अन्य सहभागी महिलांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. पत्रकार संघाचे अध्यक्ष भास्कर खंडागळे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी संत सावता महाराज मंडळ, भजनी मंडळ व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## कर्मातूनच भक्ती; भक्तीच्या माध्यमातून परमात्मप्राप्तीचा मार्ग : स्वामी प्रकाशनंदगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** संत सावता महाराजांनी आपल्या कर्मामध्येच भक्तीची जोड देत परमात्मप्राप्तीचा मार्ग समाजाला दाखविला. संतांना जात-धर्माचे बंधन नसते. त्यांच्यासाठी सर्व समान असून भक्ती, भाव आणि सेवा हीच श्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशनंदगिरीजी महाराज यांनी केले.



टाकळीभान येथील श्री संत सावता महाराज मंदिरात संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३१ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कीर्तनसेवेत ते बोलत होते. संत सावता महाराज प्रेम व भक्तीचे प्रतीक होते. 'कांदा, मुळा, भाजी अवघी विठाई माझी' या भावनेतून त्यांनी कर्म करतानाच भक्तीद्वारे परमेश्वरप्राप्तीचा मार्ग दाखविला, असे महाराजांनी सांगितले. संसाराला धार्मिकता व संस्कारांची जोड असणे आवश्यक आहे. पैसा कमावला, मात्र मुलांवर चांगले संस्कार झाले नाहीत तर संपत्ती क्षणात नष्ट होऊ शकते. सध्याच्या काळात माणुसकी कमी होत असून, नवीन पिढीला अध्यात्म व धार्मिकतेशी जोडण्याची गरज आहे. वारकरी शिक्षण संस्था यासाठी महत्त्वपूर्ण कार्य करीत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पुण्यतिथीनिमित्त सकाळी संत सावता महाराजांच्या प्रतिमेची गावातून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. महिला तुळशी कलश घेऊन सहभागी झाल्या. ग्रामस्थांनी ठिकठिकाणी सडा-रांगोळी करून मिरवणुकीचे स्वागत केले. कीर्तनानंतर स्वामी प्रकाशनंदगिरीजी महाराजांचा ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास टाळकरी, भजनी मंडळ, भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समिती, ट्रस्ट पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# मुंबई-पुण्यासारखी अत्याधुनिक न्यूरोसुविधा आता शिर्डीत

## डॉ. मुकुंद चौधरी यांच्या रुग्णालयाला रुग्णांचा प्रतिसाद

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील नांदुर्खी या छोट्याशा गावातील अत्यंतिक जिद्दीने आणि उच्च शिक्षणाचे ध्येय ठेवून पुढे आलेले डॉ. मुकुंद अर्जुन चौधरी हे आज वैद्यकीय क्षेत्रात एकआदराचे नाव बनले आहेत. राहाता-शिर्डी परिसरामध्ये त्यांचे 'डॉक्टर चौधरी ब्रेन अँड स्पाइन हॉस्पिटल' (मेंदू व मणके विकार तज्ज्ञ रुग्णालय) गेल्या सहा महिन्यांपासून कार्यरत असून,डोकेदुखी प्यारालीसीस अपघात मणके विकार ब्रेन ट्युमर फिट्स या रोगावर ते रुग्णांना वरदान ठरत आहेत.



डॉ. मुकुंद अर्जुन चौधरी यांचे वैद्यकीय शिक्षण अत्यंत उच्च पातळीवर झाले आहे. त्यांनी चइइड, चड तसेच न्यूरोसर्जरीमधील अतिउच्च पदवी मानली जाणारी च.उह (छर्शीऑ डीऑसशऑ) ही पदवी प्राप्त केली आहे. अत्यंत क्लिष्ट मानल्या जाणाऱ्या न्यूरोसर्जरीच्या क्षेत्रात त्यांनी प्राविण्य मिळवले असून, ते या विषयातील अत्यंत निष्णात आणि तज्ज्ञ शल्यचिकित्सक आहेत. स्वतःचा स्वतंत्र दवाखाना सुरू करण्यापूर्वी त्यांनी साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे अनेक वर्षे निष्ठापूर्वक सेवा बजावली. या सेवाकालावधीत त्यांनी आपल्या उत्कृष्ट वैद्यकीय कौशल्याच्या बळावर रुग्णांच्या मनात आणि वैद्यकीय वर्तुळात मोठे नाव व लौकिक मिळवला. लोकांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने त्यांनी शिर्डी-राहाता रोडवरील नगर-मनमाड महामार्गावरील दंडवते कॉम्प्लेक्स येथे स्वतःचे 'डॉक्टर चौधरी मेंदू व मणके विकार हॉस्पिटल' सुरू केले आहे. हे रुग्णालय अत्यंत अत्याधुनिक आणि सर्वसुविधांनी सुसज्ज आहे .या हॉस्पिटलमधील बाह्यरुग्ण विभाग,आंतररुग्ण विभाग, अत्याधुनिक अतिदक्षता विभाग अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह उपचारांमुळे रुग्णांना या सुविधा तत्पर मिळत आहे. डॉ. मुकुंद चौधरी यांची अचूक निदान करण्याची हातोटी आणि उपचारांची प्रभावी पद्धत यामुळे ते अल्पावधीतच रुग्णांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. त्यांच्या याच गुणवत्तेमुळे शिर्डी-राहाता परिसरासह आसपासच्या अनेक जिल्ह्यांतून व तालुक्यांमधून जसे की अहमदनगर (अहिल्यानगर), छत्रपती संभाजीनगर, नाशिक, संगमनेर, अकोले आदी परिसरावरून शेकडो रुग्ण उपचारासाठी येत आहेत. मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये मिळणारी अत्यंत खर्चिक आणि उच्च दर्जाची न्यूरोसर्जरीची ट्रीटमेंट आता डॉ . मुकुंद चौधरी यांच्या माध्यमातून शिर्डीसारख्या ठिकाणी उपलब्ध झाली आहे. आर्थिक दुर्बलता किंवा मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेणे परवडत नसणाऱ्या रुग्णांना त्यांच्याच भागात मुंबई-पुण्यासारखी आधुनिक उपचारपद्धती मिळाल्यामुळे डॉ . चौधरी हे गरीब व सामान्य रुग्णांसाठी एक नवा आशेचा किरण ठरत आहेत.

## साई संस्थान उभारणार गोशाळा

### सतीश गंगवाल यांच्या प्रयत्नांना यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साईबाबांनी आपल्या हयातीत प्राणीमात्रांवर दया आणि गोसेवेचा संदेश दिला. त्यांचा हा वसा पुढे नेत श्री साईबाबा संस्थानने रुई शिवारात गोशाळा उभारावी, अशी आग्रही मागणी करणारे उद्योजक व साईभक्त सतीश गंगवाल यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. गोशाळा उभारणीसाठी संस्थानने न्यायालयात ठराव पाठविला असून मंजुरी मिळताच गोशाळेच्या उभारणीला सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

साई संस्थानला गोशाळा किती आवश्यक आहे हे पटवून देत, साईबाबांच्या संपूर्ण जीवनात गोसेवा आणि करुणेचा संदेश दिला आहे. गोमता ही आमची माता आहे. साईबाबांची संपूर्ण जीवन कथा ही गोसेवेने भरलेली आहे.साईबाबांच्या संपूर्ण जीवनात गोसेवा आणि करुणेचा संदेश दिला आहे. साईबाबांची संपूर्ण जीवन कथा ही गोसेवेने भरलेली आहे.

रुई शिवारात साईसंस्थानची जमीन पडून आहे. त्या ठिकाणी जर गोशाळा उभी केली तर ती अधिक पवित्र आणि सात्विक ठरेल. तसेच गोशाळेतील शेणापासून गोबर गॅस तयार करून तो महाप्रसादालयात वापरता येईल. त्यामुळे दररोज लाखो साईभक्तांसाठी गोरस आणि महाप्रसाद तयार करण्यासाठी देशी गोमातेचे मोठे योगदान होईल. परिणामी, संस्थानला कमी खर्चात पर्यावरण पूरक प्रकल्प उभारता येईल. यावेळी साईभक्त गोशाळेचे उपाध्यक्ष प्रविण पटेल, घनश्याम दोडीया, युवक काँग्रेसचे विकास गोंदकर आदी उपस्थित होते.



# अवैध गोवंश कत्तलीवर धाड

## गोवंशासह मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील भारत नगर भागात सुरु असलेल्या अवैध गोवंश कत्तलीच्या ठिकाणी पोलिसांनी सोमवारी (दि. ११) धडक कारवाई केली. या छाप्यात पोलिसांनी विविध प्रजातींचे गोवंश जनावरे, कत्तलीचे साहित्य आणि इतर साहित्य असा एकूण ६ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मिळालेल्या बातमीनुसार, वैजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भारत नगर येथील एका शेडमध्ये आणि शेजारील मोकळ्या जागेत बेकायदेशीरपणे गोवंश जमा करून त्यांची कत्तल केली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पथकासह घटनास्थळी धाड टाकली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी शेडमधून व मोकळ्या जागेतून सुमारे १५ हून अधिक गाई, वासरे व पाड्यांची सुटका केली. तसेच घटनास्थळावरून लाकडी मेख, प्लास्टिकचे ड्रम, इलेक्ट्रॉनिक वजन काटा आणि कापडी पिशवीत ठेवलेले जनावरे कापण्याचे साहित्य (सुरी, कोयता, कुऱ्हाड इत्यादी) असा सुमारे २० हजार रुपयांचे साहित्य जप्त केले.

सुटका करण्यात आलेल्या गोवंशाची एकूण बाजारपेठीय किंमत लाखो रुपयांच्या घरात आहे.पोलीस धाड टाकण्यासाठी पोहचताच संशयित आरोपी अंधाराचा व परिस्थितीचा फायदा घेऊन पसार झाले. या प्रकरणात आरोपी अजून निष्पन्न झाले नसून, अज्ञात आरोपींविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. कारवाई करणारे पोलीस पथक ही यशस्वी कारवाई परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक विवेक सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक जाधव व नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अविनाश भास्कर, योगेश झाल्टे, अमोल कांबळे, प्रशांत गीते, प्रल्हाद जटाळे, ऋषिकेश पैठणकर, अनिल दाभाडे आणि किरण रावते यांच्या पथकाने केली. पोलीस पथकाच्या या धाडसी कारवाईमुळे अवैध गोवंश कत्तल करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. साहिल सत्तार कुरेशी यांच्या पत्राच्या शेडमध्ये गायांचा साठा जप्त करण्यात आला

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# 'खेलो इंडिया'मुळे ग्रामीण खेळाडूंना नवी भरारी

## अहिल्यानगर क्रीडा क्षेत्रात आघाडीवर : डॉ. सुस्मिता विखे पाटील



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्रीडा कौशल्याची कमतरता नाही. त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि सुविधा मिळणे गरजेचे आहे. केंद्र सरकारच्या 'खेलो इंडिया'सारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होत आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात.

अहिल्यानगर जिल्ह्याला क्रीडा क्षेत्रात आणखी पुढे नेण्यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले. लोणी येथील प्रवरा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद आणि प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ वर्षांखालील मुलींच्या राज्यस्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेच्या शुभारंभप्रसंगी त्या बोलत होत्या. डॉ. विखे पाटील म्हणाल्या, शिक्षण आणि खेळ ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची दोन महत्त्वाची चाके आहेत.

प्रवरा शैक्षणिक संकुलात शिक्षणासोबत क्रीडेलाही विशेष महत्त्व दिले जाते. राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन प्रवरेला मिळणे ही अभिमानाची बाब असून, यामुळे ग्रामीण विद्यार्थिनींना राज्यातील गुणवंत खेळाडूंसोबत खेळण्याचा अनुभव मिळणार आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी अहिल्यानगर जिल्हा क्रीडा क्षेत्रात आघाडीवर असल्याचे सांगितले. 'खेलो इंडिया'सोबत 'मिशन लक्षवेध'च्या माध्यमातून विविध खेळांना प्रोत्साहन दिले जात आहे. प्रवरेमध्ये लवकरच 'मिशन लक्षवेध'अंतर्गत हॉकीचे विशेष प्रशिक्षण सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील वर्षी जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये ९३ पदके मिळवून जिल्ह्याचा लौकिक वाढविला, अशी माहितीही त्यांनी दिली. स्पर्धेत नाशिक, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, लातूर, क्रीडा प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे विभागातील नऊ संघ सहभागी झाले आहेत. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंमधून राज्य संघाची निवड करण्यात येणार आहे. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोना निचळ यांनी केले, तर आभार नितीन शिरसाठ यांनी मानले.

---

## द • ख • ल

### चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श शाळेचे विद्यार्थी राज्यात चमकले

**सोनई** : पानसवाडी येथील स्व. तुकाराम गडाख स्थापित आदर्श विद्या मंदिर सोनईच्या प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले. शिंदे स्वरा सागर व चांदघोडे स्वराज रमाकांत या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. या परीक्षेस विद्यालयातील ३७ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ९१.९० टक्के लागला आहे. स्वरा सागर शिंदे हिने जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले असून, तिला शासनामार्फत सलग तीन वर्षे शिष्यवृत्ती मिळणार आहे. आणखी चार विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक अनिल दरंदले, संस्थेच्या अध्यक्षा जयश्री गडाख, सचिव रविराज गडाख तसेच शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले.

### आदर्श विद्यालयात हर घर तिरंगा अभियान

**सोनई** : पानसवाडी येथील श्री हनुमान ग्रामीण व संशोधन शिक्षण मंडळाच्या आदर्श विद्यालयात हर घर तिरंगा अभियानांतर्गत आदर्श विद्या मंदिर सोनई माध्यमिक विभागांमध्ये वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या, विद्यार्थ्यांनी सुंदर रीतीने स्वातंत्र्य दिना विषयी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये ९५ विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला. वक्तृत्व स्पर्धेसाठी निसर्ग व आवटे यांनी काम पाहिले.

### आदर्श विद्यालयात नशा मुक्ती अभियान



**सोनई** : पानसवाडी ता. नेवासा येथील स्व. तुकारामजी पाटील गडाख स्थापित श्री हनुमान ग्रामीण व संशोधन शिक्षण मंडळ आयोजित आदर्श विद्यालयांच्या माध्यमिक विभागामध्ये नशा मुक्ती अभियान या अंतर्गत ओम शांती मधील ब्रह्मकुमारी उषा दीदी व त्यांच्या कमिटीने आदर्श शाळेत नशा मुक्ती अभियाना अंतर्गत सखोल मार्गदर्शन करून मुलांना चांगल्या सवयी चांगले वर्तन मोबाईल पासून दूर राहणे आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी शरीराला घातक असणाऱ्या पदार्थांचे सेवन करू नये असे धडे देत अभियान राबविण्यात आले. योग्य संस्कारामुळेच आपले चांगले चारित्र्य घडत असते असे मौलिक विचार उषा दीदींनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पवार एस. पी व शिक्षक वृंद यांनी ब्रह्मकुमारी उषा दिदी व सहकार्यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. यावेळी त्यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना नशा शपथ दिली. चित्रकला स्पर्धा घेत मुख्यध्यापक एस. पी. पवार, शिक्षक तुवर, बुधवंत, शिक्षक डाके, यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते.

### कान्हेगाव शाळेतील विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप



**पढेगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील कान्हेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना 'मिशन आपुलकी' या उपक्रमांतर्गत स्पोर्ट्स ड्रेस आणि ११,००० रुपयांची रोख देणगीचे वाटप करण्यात आले. शाळेच्या माजी विद्यार्थिनी व पोलिस कर्मचारी सुनिता शशिकांत सूर्यवंशी यांनी स्वतःच्या शाळेप्रती प्रेम व्यक्त करत हा कौतुकास्पद उपक्रम राबविला. शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती मनोज खरात, प्रमुख पाहुणे म्हणून शशिकांत सूर्यवंशी होते. यावेळी,विमलबाई बर्डे, संरपच सुरेखा देवराय, धनंजय खरात, अतुल खरात, विशाल खरात, महेश खरात, रावसाहेब खरात, अशोक खरात, संजय देवराय, हरिभाऊ खरात, संजय खरात, पोपट खरात, यांच्यासह मुख्याध्यापक गणेश महाडिक, शिक्षिका मनिषा खैरनार, दिपाली खरात व परिगाबाई खरात आदी ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक गणेश महाडिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका मनिषा खैरनार यांनी मानले. माजी विद्यार्थ्यांच्या या कृतज्ञतापूर्ण उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

---

## एस. के. सोमय्या प्राथमिक विद्यामंदिरचे ७६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत चमकले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर येथील एस. के. सोमय्या प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. शाळेचे तब्बल ७६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून, या विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत एकूण १२ लाख ९७ हजार ५०० रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. इयत्ता चौथीचे ३१ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत, इयत्ता पाचवीचे २४ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत, तर इयत्ता सातवीचे तीन विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आणि १८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत पात्र ठरले आहेत. इयत्ता चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांना एका वर्षात २ लाख ७५ हजार रुपये, तर तीन वर्षांत ८ लाख २५ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना एका वर्षात १ लाख ५७ हजार ५०० रुपये, तर तीन वर्षांत ४ लाख ७२ हजार ५०० रुपये मिळणार आहेत. या यशासाठी प्रेरणास्थान मीनाताई जगधने यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका सोनाली पैठणे यांच्या नियोजनासह वर्गशिक्षिका अनिता चेडे, मेघा पवार, कोमल धुमाळ, सुवर्णा थोरात व विशेष शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## इन्स्टाग्रामवर कॉल; महिलेचा पाठलाग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील २८ वर्षीय महिलेचा सोशल मीडियावरून तसेच प्रत्यक्ष पाठलाग करून मानसिक त्रास दिल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फैजान इस्माईल शेख (रा. वॉर्ड नं. ६, डावखर रोड, श्रीरामपूर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत पीडित महिलेने पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फैजान शेख याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती. महिलेने ती स्वीकारल्यानंतर आरोपी तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीला वारंवार रिप्लाय करू लागला. तसेच ऑडिओ व व्हिडीओ कॉल करून संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होता. सुरुवातीला महिलेने त्याचे कॉल स्वीकारले नाहीत. दरम्यान, संबंधित तरुण कामावर जाताना आपला पाठलाग करीत असल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यामुळे तिने हा प्रकार आपल्या बहिणीच्या मुलासह नातेवाईकांना सांगितला. चौकशी केली असता संबंधित तरुण ओळखीचा असल्याचे समोर आले. त्यानंतर महिलेने आरोपीकडे दुर्लक्ष करून थेट श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली. तिच्या फिर्यादीवरून फैजान इस्माईल शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## आकांक्षा विनोद तांबे यांना राज्यस्तरीय सह्याद्री रत्न पुरस्कार प्रदान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : नालंदा फाउंडेशन, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित 'राज्यस्तरीय सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळा २०२६' मध्ये साहित्य व काव्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आकांक्षा विनोद तांबे यांना 'राज्यस्तरीय सह्याद्री रत्न पुरस्कार महाराष्ट्र राज्य २०२६' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बालाजी देडगाव येथील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व कचरू तांबे यांच्या त्या सुनबाई असून, साहित्य व काव्य क्षेत्रात आपल्या लेखणीतून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आकांक्षा तांबे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या या गौरवामुळे बालाजी देडगावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथील पत्रकार भवन, नवी पेठ येथे हा भव्य पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

## वंचित, आदिवासी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे सूर्योदय परिवाराचे कार्य कौतुकास्पद



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : वंचित आणि आदिवासी समाजातील मुलांना शिक्षण, संस्कार, क्रीडा आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून आत्मनिर्भर व उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाण्याचे कार्य सूर्योदय परिवार सातत्याने करीत आहे. या माध्यमातून अनेक मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आले असून, हा उपक्रम समाज परिवर्तनाच्या दृष्टीने प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील श्री सद्गुरु दत्त धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्टद्वारे संचालित सूर्योदय पारधी समाज आदिवासी आश्रम विद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य ऑडिटोरियम तसेच तीन अत्याधुनिक क्रीडांगणांनी सुसज्ज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे लोकार्पण भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, भाजपचे ज्येष्ठ नेते आशुतोष तिवारी, देवासचे खासदार महेंद्रसिंह सोलंकी, भाजपा किसान मोर्चाचे मध्यप्रदेश प्रदेश मंत्री राजीव पटेल, अमनोरा फाउंडेशनचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, आमदार आंबादास दानवे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प.पू. भय्यूजी महाराज यांनी शिक्षण, संस्कार आणि सेवेला समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानून वंचित व गरजू घटकांच्या उत्थानासाठी विविध उपक्रम राबविले. त्यांच्या विचारांना पुढे नेत आश्रम विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शैक्षणिक व क्रीडा सुविधांची निर्मिती करण्यात आली आहे. नव्याने उभारलेले ऑडिटोरियम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. तर तीन अत्याधुनिक क्रीडांगणांमुळे विद्यार्थ्यांना क्रीडा कौशल्य विकसित करून राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती करण्याची संधी मिळणार आहे. हे लोकार्पण केवळ इमारत व क्रीडांगणांचे उद्घाटन नसून, भय्यूजी महाराजांनी पाहिलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाच्या पूर्ततेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शिक्षण, सेवा आणि संस्कारांच्या माध्यमातून वंचित व आदिवासी समाजातील नव्या पिढीला सक्षम, आत्मविश्वासी आणि स्वावलंबी बनविण्याचे सूर्योदय परिवाराचे कार्य कौतुकास्पद असल्याचे भागवत यांनी नमूद केले. दरम्यान, सूर्योदय परिवाराच्या माध्यमातून शिक्षणासोबत आरोग्यसेवा, कौशल्य विकास, मोफत प्रशिक्षण, महिला स्वावलंबन, आश्रम, बालगृह, अन्नक्षेत्र आणि विविध सामाजिक सेवा प्रकल्प राबविले जात आहेत. नव्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच चालना मिळेल, असे सूर्योदय परिवाराच्या संचालिका डॉ. आयुषी उदयसिंह देशमुख यांनी सांगितले.


## नेवासा नगरपंचायत, नेवासा

नेवासा, ता. नेवासा जि.अहिल्यानगर महाराष्ट्र-४१४६०३

जा.क./ DAY-NULM विभाग/न.पं. नेवासा ११३६/२०२६ दिनांक ११/०८/२०२६

### जाहीर सूचना

केंद्र शासनाद्वारे पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४, दि.०५/०३/२०१४ रोजी लागू करण्यात आलेला आहे. तसेच, सदर अधिनियमातील कलम ३६ (१) नुसार महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६, दि.०३/०८/२०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्रचे विनियमन) अधिनियम २०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क.३ व ४ मधील तरतुदीनुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकरिता तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणे बंधकारक आहे. सदर नियमानुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणासाठी गठीत करण्यात येणाऱ्या तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये अध्यक्ष म्हणून दिवाणी न्यायाधीश अथवा न्यायदंडाधिकारी तसेच सदस्य म्हणून इतर दोन व्यावसायिक व्यक्तींचा समावेश असणे आवश्यक आहे. समितीच्या अध्यक्ष व सदस्यांना कार्यकाळ पाच वर्षाचा असेल.

सदर तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती मध्ये सदस्य म्हणून नियुक्तीसाठी नियम ४ नुसार खालील अहर्ता व अनुभव असलेल्या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | पद संख्या | अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य | २ | **१**. वय ३५ वर्षापेक्षा अधिक व ६५ वर्षापेक्षा कमी असावे.<br>**२**. मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण केलेली असावी.<br>**३**. स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असावा व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शासनाच्या अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पदावर कार्य केलेले असावे.<br>**४**. कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असावी तसेच सामाजिक कार्य, पाठविक्रेते, सार्वजनिक काम अथवा नागरी/सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित विषयांमध्ये किमान १० वर्षाची पर्याप्त अनुभव किंवा ज्ञान असावे. |

तरी पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज दि. २०/०८/२०२६ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह साक्षांकित प्रतींसह या कार्यालयात सादर करावेत. या विषयी अधिक माहितीसाठी नेवासा नगरपंचायत, नेवासा दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) विभाग येथे संपर्क साधावा.

ठिकाण :- DAY-NULM विभाग
नेवासा नगरपंचायत, नेवासा
दिनांक. २०/०८/२०२६

**(निखील फराटे)**
**मुख्याधिकारी**
**नेवासा नगरपंचायत, नेवासा**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मी गौरव बबन गुलदगड, रा. तनपुरेवाडी रोड, राहुरी, ता. राहुरी-४१३७०५, जि. अहिल्यानगर, (महा.), याद्वारे सर्व संबंधितांना जाहीरपणे कळवितो की, माझे वडील बबन बापूराव गुलदगड यांचे दिनांक ०७/१०/२०२४ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या मालकीचे महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे पिकअप वाहन, वाहन क्रमांक MH-17-CV-2998, चेसिस MA1ZN2TTKR6G27074 व इंजिन क्रमांक TTR4G19997 असे आहे.

सदर वाहनावर महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे फायनान्स होते. सदर फायनान्सची संपूर्ण पूर्तता झालेली असून, संबंधित कंपनीकडून सदर फायनान्स निल झाल्याबाबतचे पत्र देण्यात आलेले आहे.

माझे वडील बबन बापूराव गुलदगड यांचे दिनांक ०७/१०/२०२४ रोजी निधन झाले असून, माझी आई मनीषा बबनराव गुलदगड यांचेही दिनांक ०७/१०/२०२४ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात वारस म्हणून मी स्वतः गौरव बबन गुलदगड व माझी बहीण मयुरी सागर पुंड (माहेरचे नाव मयुरी बबन गुलदगड) असे दोन वारस आहोत. सदर वाहन माझ्या म्हणजेच गौरव बबन गुलदगड यांच्या नावावर हस्तांतरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत माझी बहीण मयुरी सागर पुंड यांनी मा. तहसीलदार यांचेसमोर रु. १००/-च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) करून, सदर वाहन माझ्या म्हणजेच तिच्या भाऊ गौरव बबन गुलदगड यांच्या नावावर हस्तांतरित करण्यास आपली कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

तरी सदर वाहनाबाबत कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसाहक्क, ताबा, दावा, हरकत अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत, दावा अथवा आक्षेप तसेच त्यासंबंधीची आवश्यक कागदपत्रे माझ्या वरील पत्त्यावर सादर करावीत.

विहित ७ (सात) दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत, दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, सदर वाहन माझ्या म्हणजेच गौरव बबन गुलदगड यांच्या नावावर हस्तांतरित करण्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून, संबंधित कार्यालयामार्फत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर सदर वाहनाबाबत कोणत्याही व्यक्तीने केलेली हरकत, दावा अथवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस मी गौरव बबन गुलदगड यांचेमार्फत सर्व संबंधितांच्या माहितीसाठी, तसेच कोणास काही हक्क, दावा अथवा हरकत असल्यास ती विहित मुदतीत सादर करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ही नोटीस प्रसिद्धीस दिल्याची तारीख: ११/०८/२०२६

**गौरव बबन गुलदगड**



### जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे पिंपळगांव रोठा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर शिवारातील लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळतीबाबत मौजे पिंपळगांव रोठा, ता. पारनेर जि. अहिल्यानगर येथिल नंदा विष्णु मुंढे, अविनाश विष्णु मुंढे, अश्विनी दिनकर जगताप यांनी त्याच्या मालकीची मौजे पिंपळगांव रोठा, ता. पारनेर येथिल गट नं १३६ पैकी ०हे ७५.५० आर + ख ०.४ क्षेत्र हे आमचे अशिल यांस विक्री करण्यासंबधी व्यवहाराची बोलणी झालेली आहे. आमच्या अशिलांस सदर क्षेत्र हे खरेदी करावायचे असून सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध, निरजोखमी, बोजाविरहीत असल्याचा पुर्ण भरवसा व खात्री वरील जमीन मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे, तरी तमांम लोकांस जाहीर नोटीस ने कळविण्यात येते की, सदर मिळकती सबंधी काही कायदेशीर हक्क, हितसंबध, गहाण, दान, खरेदी बोजा, लीज, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जमीनजप्ती, करारनामा, कुळहक्क, वारस, मुखत्यापत्र, विसार पावती, साठेखत, अगर त्यासंबंधी इतर कोणताही हक्क हितसंबध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत आमचे खालील पत्यावर लेखी, कागदोपत्री पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध, निरजोखमी ची व बिनबोजाची आहे, असे समजुन आमचे अशिल जमीन मालकासी खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील खरेदी खतानंतर कोणाचीही कसलीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोद घ्यावी.

**परीशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** डि. अ. नगर, सब. डि. तालुका पारनेर पैकी मौजे पिंपळगांव रोठा येथिल मिळकत खालीलप्रमाणे

**गट नंबर- १३६, क्षेत्र हे. आर-१.५१ ख०.०८, आकार रू.पै.-०.९५.**
**चतुः सिमा - पुर्व- रस्ता, दक्षिण - १३५, पश्चिम - १३७, उत्तर - १३९, रस्ता**

**यापैकी खरेदी देणार नंदा विष्णु मुंढे,, अविनाश विष्णु मुंढे, अश्विनी दिनकर जगताप यांच्या मालकीची संपुर्ण ०हे ७५.५० आर +ख ०.०४ आर क्षेत्र हा नोटीसचा विषय आहे. याने प्रमाणे नोटीस असे**

**ता. ११/०८/२०२६**

शिक्का

**ॲड. श्री. सुनिल कारभारी मेसे**
बी.एस.एल.एल.एल.बी
एम.ए.एच. २८२०/१९९९
मु.पो. निघोज, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर



### जाहिर नोटीस

नि-६ (प्रत)
ॲडव्होकेट टी. ए. पठाण
शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**शेवगाव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, शेवगाव, यांचे कोर्टात...**

कि.दि.अर्ज नं. ५३/२०२६ पु. ता. ४/९/२०२६

अर्जदार - १) वसिमबी अब्दुल सलाम तांबोळी, २) अकरम अब्दुल सलाम तांबोळी, ३) इमरान अब्दुल सलाम तांबोळी, ४) सईद अब्दुल सलाम तांबोळी, ५) सलमा अब्दुल सलाम तांबोळी, ६) बिलाल अब्दुल सलाम तांबोळी.

सामनेवाले - कोणीही नाही.

१. अर्जदार नं. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील अब्दुल सलाम गफुर तांबोळी हे मौजे इंदिरानगर, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर येथे दि. ३१/१२/२०२५ रोजी त्यांचे रहाते घरी मयत झालेले आहेत. मयत अब्दुल सलाम गफुर तांबोळी यांना कायदेशिर वारस अर्जदार नं. १ ते ६ हेच कायदेशिर वारस आहे. २. अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची गरज भासल्याने अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. ३. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे सदरहु वारस प्रमाणपत्राबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. अर्जदार त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास वारस प्रमाणपत्र घेणेबाबत आदेश करतील. आज दि. ११ माहे ०८ सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यनिशी दिले.

**सही/-**
**क. लिपिक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर शेवगाव**

शिक्का

**हुकमावरुन**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर शेवगाव**



### सायटेशन नोटीस

प्रो.फी. जमा.रु., पान नं
दि.२८.०७.२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं.

अर्जदार
१. श्री प्रकाश चंद्रभान उदागे रा.सुसरे ता. पाथर्डी
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे सुसरे येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. प्रकाश चंद्रभान उदागे यांच्या मुलाचा जयंत प्रकाश उदागे यांचा जन्म दि. ०७/०४/२०२० रोजी सिध्दीविनायक हॉस्पीटल शेवगांव ता. शेवगाव जि अहिल्यानगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलाचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलाचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावून जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०९.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलाचा जन्म/मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दिः । । २०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहुन कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. ०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

हुकमावरुन

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार शेवगाव**
**तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**



### सायटेशन नोटीस

प्रो. फी. जमा.रु.
पान.नं.दि. २८/०७/२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं. / ६५३

अर्जदार
१. श्री श्रीकांत बाबासाहेब झिरपे रा. कोळगांव ता. शेवगांव
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे कोळगांव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. श्रीकांत बाबासाहेब झिरपे यांच्या मुलीचा श्रुती श्रीकांत झिरपे यांचा जन्म दि.२०.०६.२०२६ रोजी रेणुका हॉस्पीटल शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलीचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलीचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०६.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलीचा जन्म/मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. २६/०८/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. १०/०८/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का

**हुकमावरुन**
**सही /-**
**तहसिलदार शेवगाव**
**तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

# पान १ वरुन

## अर्थमंत्री सीतारामन यांचा 'डीपफेक' व्हिडीओ...

स्पेसएक्स कंपनीच्या शेअर्समध्ये 'प्री-आयपीओ' गुंतवणुकीची संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. यातून मोठा आर्थिक फायदा होईल, असे आमिष दाखवत त्याच्याकडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करून घेण्यात आले.

२ जून ते २३ जुलै या कालावधीत तब्बल ३६ व्यवहारांमधून १ कोटी ७ लाख रुपये हस्तांतरित करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दरम्यान, आरोपींनी तयार केलेल्या बनावट ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर व्यावसायिकाच्या खात्यावर ३ कोटी ९८ लाख रुपयांचा नफा झाल्याचे दाखवण्यात आले.

सुरुवातीला सुमारे सात लाख रुपये काढण्याची परवानगी देऊन आरोपींनी त्याचा विश्वास आणखी पक्का केला. मात्र, संपूर्ण रक्कम काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर विविध कारणे सांगत अतिरिक्त पैसे भरण्याची मागणी करण्यात आली. वारंवार पैसे मागितल्यानंतरही रक्कम मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर व्यावसायिकाला आपली फसवणूक झाल्याचा संशय आला. त्यानंतर आरोपींनी संपर्क तोडल्याने संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

एआयच्या साहाय्याने तयार केलेला व्हिडीओ आणि आवाज इतका हुबेहूब असू शकतो की, सामान्य व्यक्तीला तो बनावट असल्याचे सहज लक्षात येत नाही. याचाच फायदा घेत सायबर गुन्हेगार नागरिकांना ट्रेडिंग प्लॅटफॉर्म, शेअर बाजारातील गुंतवणूक तसेच विविध योजनांच्या नावाखाली मोठ्या रकमा गुंतवण्यास भाग पाडत आहेत.

प्रसिद्ध व्यक्तीचा चेहरा, आवाज किंवा व्हिडीओ असला तरी तो खरा आहेच, असे समजू नये. संबंधित कंपनी, गुंतवणूक योजना आणि ट्रेडिंग प्लॅटफॉर्मची अधिकृत माहिती तपासल्यानंतरच कोणताही आर्थिक व्यवहार करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## शिवसेना 'पक्षफुटी'वरून...

निवडणूक आयोगाने ही पक्षघटना 'अलोकतांत्रिक' असल्याचे मानून तिच्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यावर सिब्बल यांनी प्रश्न उपस्थित केला. ज्या पक्षघटनेनुसार शिंदे गटातील अनेक नेत्यांनी शिवसेनेत पदे आणि जबाबदाऱ्या स्वीकारल्या, त्याच पक्षघटनेला नंतर अलोकतांत्रिक ठरवून बाजूला करता येईल का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पक्षघटना अलोकतांत्रिक असल्याचे गृहीत धरले, तरी त्यावरून पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह दुसऱ्या गटाला देण्याचा निष्कर्ष आपोआप निघत नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला.

राजकीय पक्षाची संघटनात्मक स्वायत्तता आणि नागरिकांच्या संघटना स्थापन करण्याच्या अधिकाराच्या संदर्भात संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(क) चाही उल्लेख करण्यात आला. या तरतुदीनुसार नागरिकांना संघटना किंवा संस्था स्थापन करण्याचा अधिकार आहे.

यावर सुनावणीदरम्यान न्या. जॉयमाल्या बागची यांनी अनुच्छेद १९(४) मधील 'सार्वजनिक सुव्यवस्था' आणि 'नैतिकता' या संकल्पनांच्या व्यापकतेकडे लक्ष वेधले. त्यामुळे शिवसेना वाद केवळ पक्षाचे नाव आणि चिन्ह कोणाला मिळावे, इतक्यापुरता मर्यादित न राहता राजकीय पक्षाचे घटनात्मक अस्तित्व, अंतर्गत लोकशाही, संघटनात्मक अधिकार आणि निवडणूक आयोगाच्या अधिकारकक्षेपर्यंत पोहोचला आहे.

त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय शिवसेनेच्या दोन्ही गटांसाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरण्याबरोबरच भविष्यातील पक्षफुटी, निवडणूक चिन्हांचे वाद आणि राजकीय पक्षांच्या संघटनात्मक अधिकारांच्या दृष्टीनेही दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो.

# कांदा विक्रीवरून शेतकरी-व्यापाऱ्यात वाद

## गंगापुरच्या व्यापाऱ्याचे लायसन्स रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा विक्रीदरम्यान शेतकरी आणि व्यापाऱ्यामध्ये वाद झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ संतप्त शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या कार्यालयात मोठ्या संख्येने जमा होत संबंधित व्यापाऱ्याचे लायसन्स रद्द करण्याची मागणी करत बगडी येथील शेतकरी दत्तू सूर्यभान बोडखे यांनी बाजार समितीच्या सचिवांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.



तक्रारीनुसार, बोडखे यांच्या कांद्याचा पहिल्या लिलावात २ हजार ४०० रुपये भाव लागला होता. मात्र, त्यानंतर संबंधित व्यापाऱ्याने कांदा घेण्यास नकार दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा लिलाव करण्यात आला. दुसऱ्या लिलावात कांद्याला २ हजार ३०० रुपये भाव मिळाल्याचे शेतकऱ्याने नमूद केले आहे.

यावेळी आपण व्यापाऱ्याला, एक हजार रुपये कमी गेले तर मी काही भिकारी होणार नाही, असे सांगितल्याचे बोडखे यांनी तक्रारीत म्हटले आहे. मात्र, त्यानंतर संबंधित व्यापाऱ्याने आपल्याशी अरेरावीची भाषा करत गैरवर्तन व शिवीगाळ केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकाराची माहिती मिळताच मोठ्या संख्येने शेतकरी बाजार समितीच्या कार्यालयात दाखल झाले. संबंधित व्यापाऱ्यावर कठोर कारवाई करावी, त्याचे लायसन्स रद्द करावे, तसेच शेतकऱ्यांशी गैरवर्तन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. बाजार समितीतील लिलाव प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा आणि शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक मिळावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. दरम्यान, शेतकऱ्यांनी केलेल्या आरोपांबाबत संबंधित व्यापाऱ्याची बाजू अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे बाजार समिती प्रशासन या तक्रारीची चौकशी करून काय निर्णय घेते आणि संबंधित व्यापाऱ्यावर कोणती कारवाई केली जाते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# बस थांबविण्यावरून जातिवाचक शिवीगाळ,

बसचालकाविरुद्ध अॅट्रॉसिटी दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** शिऊर येथून कामानिमित्त वैजापूर येथे आलेल्या व्यक्तीचा बस थांबविण्याच्या कारणावरून शासकीय बसचालकाशी वाद झाला. या वादातून जातिवाचक शिवीगाळ करून धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला असून, याप्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात बसचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहितेसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबासाहेब पगारे (वय ४८, रा. शिऊर, ता. वैजापूर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ८ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास ते वैजापूर बसस्थानकात आले होते. त्यावेळी एमएच १४ एनई ६५९८ क्रमांकाची शासकीय बस बसस्थानकात आली. बस थांबविण्याच्या कारणावरून पगारे व चालक यांच्यात वाद झाला.

या वादादरम्यान चालकाने पगारे यांच्या गळ्यातील निळ्या रंगाच्या इडझ मफलरवरून त्यांची जात ओळखून जातिवाचक शिवीगाळ केली व धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या तक्रारीवरून वैजापूर पोलिसांनी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी अद्याप अटकेत नसून, पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी पुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची दिशा

## वांजरगाव जि.प. गटातील शाळेला संगणक भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील वांजरगाव तंत्रज्ञानाचा ध्यास, गुणवत्तेचा विकास; उज्वल गंगथडीसाठी एक छोटासा प्रयास... या संकल्पनेतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळावे, यासाठी वांजरगाव जिल्हा परिषद गटातील प्राथमिक शाळेला संगणक भेट देण्यात आला.




गुरुवर्य महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते आणि जिल्हा परिषद सदस्य पंकज सुधाकर ठोंबरे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. डिजिटल युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, तसेच विद्यार्थ्यांचा तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने संगणक देण्यात आला.यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय वाकलेकर, प्रतापदादा धोर्डे, पंचायत समिती सदस्या सौ. मिनाताई प्रतापदादा धोर्डे, बाळासाहेब आबा भोसले, सुरज नाना पवार, विनायक बाबा गाडे, पंचायत समिती सदस्य राहुल भाऊ लांडे, दत्तू नाना खटाणे, विशाल भाऊ बारसे, अर्जुन मामा शिंदे, उद्धव भाऊ खटाणे, कैलास सातपुते, भगवान मोईन, संदिप मोटे आदी उपस्थित होते.

# नशेत महामार्गाच्या मधोमध तरुणाचा धिंगाणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** नशेच्या अंमलात बेभान झालेल्या एका तरुणाने नाशिक-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या मधोमध वाहन उभे करून धिंगाणा घातल्याची घटना दोन ते तीन दिवसांपूर्वी वैजापूर शहरात घडली. या प्रकारामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

सकाळी साडेसातच्या सुमारास संबंधित तरुणाने महामार्गाच्या मधोमध वाहन थांबवून रस्त्यावर गोंधळ घालण्यास सुरुवात केली. 'मला मारा, नाहीतर मी कोणाला तरी मारेन,' अशा प्रकारची वक्तव्ये तो करीत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. तरुण नशेत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले; मात्र त्याने नेमके कोणते पदार्थ सेवन केले होते, याची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

वाहन रस्त्याच्या मधोमध उभे असल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या. माहिती मिळताच पोलीस कर्मचारी प्रल्हाद जटाले यांनी घटनास्थळी धाव घेत तरुणाला समजावून रस्त्याच्या बाजूला नेले. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

या घटनेमुळे वैजापूर शहरातील वाढत्या नशेखोरीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, नशेच्या पदार्थांच्या पुरवठा साखळीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# निधन वार्ता

## पार्वताबाई भोकनळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर :** येथील जुन्या पिढीतील सो पार्वताबाई शंकर भोकनळ वय (७०)यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांचे पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा मोठा परीवार असून प्रवरा हॉस्पिटल लोणी येथे लॅब टेक्निशन म्हणून कार्यरत असलेले रविराज भोकनळ यांच्या त्या मातोश्री होत.

## सुलोचनाबाई चौधरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** राहाता तालुक्यातील शिंगवे येथील सुलोचनाबाई भागूजी चौधरी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, सुना आणि नातवंडे असा परिवार असून त्या शिंगवे गावचे माजी सरपंच गोरक्षनाथ भागूजी चौधरी व पिंपळवाडी येथील शंभूराजे माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक सर्जेराव चौधरी यांच्या मातोश्री, सोनू गडाख यांच्या आजी होत्या.

# जुन्या वादातून विद्यार्थ्याला मारहाण ; दोघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** जुन्या भांडणाच्या कारणावरून १५ वर्षीय विद्यार्थ्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना वैजापूर येथील विनायकराव पाटील महाविद्यालय परिसरात मंगळवारी (११ ऑगस्ट) दुपारी घडल्याची फिर्याद वैजापूर पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, संबंधित १५ वर्षीय विद्यार्थी शिक्षण घेत असून तो वैजापूर येथील रहिवासी आहे. मंगळवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास तो विनायकराव पाटील महाविद्यालयात असताना यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून त्याच्याशी वाद घातल्याचा आरोप आहे. या वादातून दोन्ही आरोपींनी विद्यार्थ्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी याने हातातील लोखंडी कड्याने विद्यार्थ्याच्या डोक्यात मारून दुखापत केल्याचे, तसेच आरोपी याने जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# सह्याद्री पार्कमधील प्लॉटिंगने नैसर्गिक नाल्याचा प्रवाह अडवला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** शहरालगत ग्रामीण भाग दोनमध्ये असलेल्या 'सह्याद्री पार्क' परिसरात नैसर्गिक नाला बुजवून प्लॉटिंग केल्याच्या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले आहे. प्रशासनाने केलेल्या पंचनाम्यात नैसर्गिक नाल्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाल्याचे तसेच नाल्यात सिमेंटची पाईप टाकून पाण्याचा प्रवाह वळविण्याची व्यवस्था केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्लॉटिंगसाठी नैसर्गिक जलप्रवाहाशी छेडछाड झाल्याचे पंचनाम्यातून समोर आले आहे.वैजापूर-घायगाव रस्त्यालगत सर्वे क्रमांक १९३, १९४ व १९७ परिसराची पंचांसमक्ष पाहणी करण्यात आली. पंचनाम्यानुसार, सर्वे क्रमांक १६१ व १६२ मधून येणारा नैसर्गिक नाला सर्वे क्रमांक १९७ मध्ये प्रवेश करतो. मात्र, या ठिकाणी नाल्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाल्याचे प्रशासनाच्या पाहणीत आढळले.नाल्याचा प्रवाह अडवल्याने पावसाळ्यात पाणी साचून ते रस्त्यावर तसेच शेतांमध्ये जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा तसेच शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होण्याचा धोका आहे.

पंचनाम्यात सर्वे क्रमांक १९७ मध्ये 'सह्याद्री पार्क' नावाने एनए लेआउट करण्यात आल्याचे नमूद आहे. नैसर्गिक नाल्याच्या ठिकाणी सिमेंटची पाईप टाकण्यात आली असली, तरी नाल्यातून येणाऱ्या पाण्याच्या तुलनेत पाईपची क्षमता अपुरी असल्याचे पाहणीत आढळले. त्यामुळे पाण्याचा प्रवाह बदलून परिसरात पाणी पसरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.सर्वे क्रमांक २०० मध्येही नाल्याचे पाईपमध्ये रूपांतर केल्याने अडथळा निर्माण झाल्याची नोंद आहे. संबंधित प्लॉटिंग 'सारा लँडमार्क'च्या माध्यमातून पार्टनर निलेश सीताराम अग्रवाल यांची असल्याची माहिती पंचनाम्यात नमूद आहे. त्यामुळे लेआउट मंजुरी, पाईप टाकण्याची परवानगी व संबंधित कागदपत्रांची सखोल तपासणी करण्याची गरज आहे.

नैसर्गिक नाल्याचा प्रवाह मोकळा करून संबंधितांवर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नगर - मनमाड महामार्गासाठी वकील संघटना उतरणार रस्त्यावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** नगर - मनमाड राज्य महामार्गाची अतिशय दुरावस्था झाली आहे. या रस्त्यासाठी आजपर्यंत अनेक संघटनांनी आंदोलने मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. आता वकिल संघटनेच्या वतीने या रस्त्यासाठी १८ ऑगस्ट रोजी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले.

राहुरी येथील वकिल संघटनेच्या वतीने दि. ११ ऑगस्ट रोजी पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख व नायब तहसीलदार संध्या दळवी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनावर ॲड. प्रकाश संसारे, ॲड. संदिप खपके, ॲड. गोरक्षनाथ रसाळ, ॲड. सुंदरबापू माने, ॲड. भगवान उऱ्हे, ॲड. सुरज बिहाणी, ॲड. प्रशांत पवार, ॲड. महेश पेरणे, ॲड. अजय देशमुख, ॲड. मुस्तफा शेख, ॲड. संजय विधाटे, ॲड. विजय तांबे, ॲड. जयश्री घावटे, ॲड. श्वेता आघाव, ॲड एस एम तोडमल, ॲड. जे एम राऊत, ॲड. के एन ढोकणे, ॲड. जे व्हि नागले, ॲड. ए बी तोडमल, ॲड. एन जी तनपूरे, ॲड. पी एस पागीरे, ॲड. आर आर पंडीत, ॲड. के आर घाडगे आदिंच्या सह्या आहेत.



# संत सावता महाराजांनी कर्मालाच ईश्वरसेवेचे रूप दिले : माजी आ. अशोकराव काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** शेतीच्या कष्टमय जीवनातही विठ्ठलभक्तीचा ध्यास कायम ठेवत संत शिरोमणी सावता महाराजांनी श्रम, निष्ठा आणि भक्तीचा अनोखा संगम घडवून आणला. कष्टाला भक्तीची जोड देत त्यांनी कर्मालाच ईश्वरसेवेचे रूप दिले. त्यांचा हा संदेश आजच्या आधुनिक युगातही समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन माजी आमदार अशोकराव काळे यांनी केले.

संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोपरगाव शहरातील श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात अशोकराव काळे यांनी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ते बोलत होते.



काळे म्हणाले की, संत सावता महाराजांनी आपल्या आचरणातून कष्ट, भक्ती आणि प्रामाणिक कर्म यांचा सुंदर संगम समाजासमोर ठेवला. शेतात राबताना मुखी विठ्ठलाचे नामस्मरण आणि मनात अखंड ईश्वरभक्ती ठेवून त्यांनी कर्मालाच परमेश्वराची सेवा मानली. 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी' या अभंगातून त्यांनी दैनंदिन कष्टातही विठ्ठलाचे दर्शन घडविले. श्रमाला प्रतिष्ठा देत कोणतेही काम लहान-मोठे नसते, हा महान संदेश त्यांनी दिला.आजच्या तरुण पिढीने संत सावता महाराजांच्या कर्मयोग, समता आणि ईश्वरनिष्ठेच्या विचारांचा अंगीकार करावा. प्रामाणिक कष्ट आणि ईश्वरभक्ती यांचा मेळ साधत आपले कर्म करीत असताना पांडुरंगाचे नामस्मरण करावे, असे आवाहनही काळे यांनी केले.यावेळी माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे, रवीकाका बोरावके, दिनार कुदळे, विरेन बोरावके, कांचनताई बोरावके, अरुणाताई ताम्हाणे, तुषार ससाणे, प्रदीप नवले, प्रकाश रासकर, बापूसाहेब इनामके यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.


CHANGE OF NAME

I HAVE CHANGE OLD NAME IN MY
NASIMI RASHID KAKAR
(LEAVING CERTIFICATE)
(BEFORE NAME)
TO NEW NAME AS
NASIM JAKIR KAKAR
(AADHAR CARD NO. 6449 6118 9294)
(AFTER NAME)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE
NOTARY PUBLIC SHRIRAMPUR
PLACE- SHRIRAMPUR
DATE- 11/08/2026


# शाळकरी अल्पवयीन मुलींना दुचाकीवरून नेले; गैरवर्तनाचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** शाळेत जाण्यासाठी निघालेल्या दोन अल्पवयीन मुलींना दुचाकीवर बसवून निर्जन ठिकाणी नेऊन त्यांच्याशी गैरवर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार मांजरसुंबा परिसरातील गोरक्षनाथ गडाच्या पायथ्याशी घडल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात दोन युवकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दोन अल्पवयीन मुली शाळेत जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या ओळखीतील दोघांनी त्यांना दुचाकीवर बसण्यास सांगितले. मुलींनी नकार देऊनही त्यांना दुचाकीवर बसवून मांजरसुंबा परिसरातील गोरक्षनाथ गडाच्या पायथ्याशी नेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तेथे एका आरोपीने मुलीचा हात पकडून कपडे काढण्यास सांगितल्याचा तसेच कपडे ओढण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. दुसऱ्या आरोपीनेही तिच्या मैत्रिणीशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मुलींनी विरोध केल्यानंतर त्यांना ढकलून देण्यात आले व प्रकार कोणाला सांगितल्यास धमकी दिल्याचा आरोप आहे. सोनई पोलिसांकडून पॉक्सो कायदा कलम ८ व १२ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव करीत आहेत.

# वाकला (चांदेश्वर) साठवण तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा मार्ग मोकळा करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** तालुक्यातील वाकला (चांदेश्वर) साठवण तलाव (हत्तीघोडा प्रकल्प) या बहुप्रतीक्षित जलसंधारण प्रकल्पासाठी आवश्यक पाणी उपलब्धता प्रमाणपत्र तातडीने मिळावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विशाल शेळके यांनी विभागीय आयुक्तांच्या बैठकीत केली. छ. संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समन्वय समितीच्या बैठकीत शेळके यांनी हा प्रश्न उपस्थित केला. प्रकल्पासाठी यापूर्वी विविध विभागांकडे पत्रव्यवहार करण्यात आला असून, जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभागाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांची पूर्तताही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, प्रकल्पासाठी उपलब्ध पाण्यातील तूट स्वीकारून प्रकल्प हाती घेण्याबाबत आवश्यक सहमती अद्याप मिळालेली नसल्याने पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सन २०१० व २०१२ च्या बृहत आराखड्यात प्रकल्पासाठी २.०१ दलघमी पाण्याची तरतूद आहे. तसेच २०२४च्या सुधारित एकात्मिक राज्य जल आराखड्यातही या प्रकल्पाचा समावेश आहे. वाकला तलावामुळे पाणीटंचाईग्रस्त भागाला सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी मोठा लाभ होणार आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत व गोदावरी खोरे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक जयंत गवळी यांनी तापी पाटबंधारे विकास महामंडळाशी पत्रव्यवहार करून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.




सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि . १२ ऑगस्ट २०२६

मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१५९ २३० ७८० | ५-२ | १२९ ४८० ६६० | जोड ५९-९२-१८-७०-२४

कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१९० १२५ ११६ | ०-८ | १९० २८० ४६० | जोड ८४-१०-२५-९७-०३

मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१२६ ४५० ९०६ | ९-१ | १३७ ३८० ११९ | जोड ९७-२१-३४-०८-१५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

## द•ख•ल

### श्रीराम मंदिर भाडेकरू संघटनेच्या लढ्याला शिवसेनेचा पाठिंबा

**अमरापूर :** येथील श्रीराम मंदिर भाडेकरू संघटनेच्या विविध अडचणी व मागण्यांबाबत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांची भेट घेऊन चर्चा केली. उपलब्ध कागदपत्रे, कायदे व नियमांचा आढावा घेतल्यानंतर भाडेकरू संघटनेची बाजू कायदेशीर व धार्मिकदृष्ट्या योग्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने शिवसेनेच्या वतीने त्यांच्या न्याय्य लढ्याला ठाम पाठिंबा जाहीर करण्यात आला. यावेळी राजेंद्र दळवी, संजय भांबुरे, अविनाश मगरे, कानिफ कर्डिले, गोरख भापकर, शिवाजीराव मडके, उदय गांगुडे, अजिंक्य लव्हाट, अय्युब पठाण आदी उपस्थित होते. सुधीर सबलोक, दिनेश लव्हाट, सुरेश टाक, गीते कान्हू, राजू शहा, भास्कर राऊत, फारूक पठाण, लक्ष्मण घावणे, अरुण चव्हाण, बुद्धिराम गुप्ता, योगेश जगताप, रावजी पटेल, अंबादास सोलाट, रतिलाल पटेल, खंडू पिसोटे, रामलाल लोढे, गोपूशेठ लोहिया, सोमनाथ दारकुंडे, राजूशेठ सबलोक, सुरेश सुभेदार, हुसेन पठाण यांच्यासह अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### पिसाळ बंधूंची सुवर्ण कामगिरी

**अहिल्यानगर :** केडगाव येथील राष्ट्रीय खेळाडू विराज पिसाळ व क्षितिज पिसाळ या बंधूंनी बेंगलोर येथे झालेल्या तायक्वांदो स्पर्धेत सुवर्ण पदकांची कमाई केली. दोन्ही खेळाडू केंद्रीय विद्यालय



क्रमांक १ अहिल्यानगर या शाळेच्या माध्यमातून जलहली बेंगलोर येथील केंद्रीय विद्यालय संघटन समिती अंतर्गत खेळल्या गेलेल्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. दोन्ही बंधूंची स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. विराज गजेंद्र पिसाळ हा १९ वर्षा वयोगटात ५१ ते ५५ किलो वजन गटात खेळला असून, क्षितिज पिसाळ १४ वर्षे वयोगटात ३१ ते ३५ किलो वजनगटात खेळला आहे. सदरच्या स्पर्धा ७ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट मध्ये पार पडल्या. दोन्ही खेळाडूंच्या यशाबद्दल केंद्रीय विद्यालय क्रमांक १ चे प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच एकलव्य तायकंदो स्पोर्ट्स असोसिएशनचे सर्व प्रशिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. दोन्ही खेळाडू अहिल्यानगर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ड. गजेंद्र पिसाळ व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक शाळेचे उपशिक्षिका स्मिता पिसाळ यांचे मुले असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जेष्ठ संचालक अंबादास पिसाळ यांचे नातू आहेत. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### वयाच्या ७५ व्यावर्षी प्रा. कुंदा हळबे यांना पी.एच.डी

**अहिल्यानगर :** प. पू. डॉ. हेडगेवार शैक्षणिक संकुल, विद्या प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय व संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थी प्रा. कुंदा हळबे यांना सावित्रीबाई फुले पुणे



विद्यापीठाची पीएच.डी. पदवी दि. १० ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आली. वयाच्या ७५व्या वर्षी पीएच.डी. पदवी संपादन करून प्रा. हळबे यांनी विद्यार्थ्यांसह सर्वांसमोर शिक्षणाची अखंड साधना आणि जिद्दीचे प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. प्रा. हळबे यांनी आपल्या पीएच.डी.च्या संशोधन कार्याची सुरुवात डॉ. आश्लेषा भंडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली. त्यानंतर माजी प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे यांच्या मार्गदर्शनाने संशोधन कार्य पुढे नेले. पुढे डॉ. अविनाश भांडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण केले.

### नशा मुक्तीसाठी अहमदनगर उर्दू शाळेची जनजागृती रॅली



**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस दल व जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'नशा मुक्त अहिल्यानगर' अभियानातंर्गत नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट संचालित अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूल, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांनी शहरातून जनजागृती रॅली काढली. या रॅलीद्वारे नशामुक्तीचा संदेश देण्यात आला. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश देणारे विविध फलक हातात घेत नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली. नशा छोडो, भारत जोडो, नशा मिटाव, देश बचाव, भविष्य बनाव, सेहत का खयाल रखो अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी मंगलगेट, कोठला भागातून रॅली काढली.

# आज झाडे जपली तरच उद्या सावली : शेलार

## ८०० विद्यार्थ्यांनी घेतली शपथ; ५ हजार ५५५ रोपांचा महासंकल्प!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आपल्या वॉटर बॅगमधील उरलेले पाणी झाडांना टाका. घरातील महत्त्वाच्या वस्तू जशा आपण जपतो, तशीच झाडांचीही काळजी घेतली पाहिजे. आज आपण झाडे जपली, तरच भविष्यात आपल्याला सावली मिळणार आहे, असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश माजी नगरसेवक नितीन शेलार यांनी दिला.

सावेडी येथील जय बजरंग प्राथमिक विद्यालयात शिवगामिनी फाउंडेशनच्या वतीने पालकमंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी अभियानांतर्गत सावलीदार वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यालयातील तब्बल ८०० विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी 'ग्रीन सिटीग्रीन आर्मी'ची शपथ घेत वृक्षरक्षणाचा निर्धार केला. यावेळी शेलार बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा वृक्ष देऊन आगळ्यावेगळ्या पद्धतीने सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात शिवगामिनी फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. गायत्री गुंड पाटील यांनी फाउंडेशनच्या आगामी पर्यावरण अभियानाची माहिती देताना सांगितले की, क्रांती दिनाच्या निमित्ताने हरितक्रांती आणण्याचा फाउंडेशनचा मानस आहे. या उपक्रमांतर्गत शहरातील सहा शाळांमध्ये तब्बल ५ हजार ५५५ रोपांचे वितरण करण्यात येणार आहे. पुढील क्रांती दिनापर्यंत शहरातील सावलीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसेल, असा आमचा संकल्प आहे.या संकल्पामुळे वृक्षारोपणापासून वृक्षसंवर्धनाकडे जाणाऱ्या व्यापक अभियानाला नवी दिशा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.




विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांसह पालकांना लावलेल्या प्रत्येक रोपाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी, शिक्षक, पालक आणि ८०० विद्यार्थ्यांना 'ग्रीन सिटीग्रीन आर्मी'ची शपथ देण्यात आली. वृक्षांचे संरक्षण, संवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प यावेळी करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यालय परिसरात 'एक विद्यार्थी एक वृक्ष, एक जबाबदारी' हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास ॲड. महेश शिंदे, प्रा. डॉ. रमेश वाघमारे, ॲड. रजनी ताठे, मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, शिवगामिनी फाउंडेशनच्या अध्यक्षा ड. गायत्री गुंड पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पालक महिला प्रतिनिधी म्हणून सौ.रमा भैरी, वैशाली शिंदे, वैशाली वारे, सुमन शेवाळे, वैशाली मिसाळ आदी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. पूजा बनकर, रोहित पुंडे, अभिजीत कांबळे, ॲड. दिनेश शिंदे आणि ॲड. आरती शिंदे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले, तर ॲड. मेहूल गांधी यांनी आभार मानले.

# राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला मजबूत व दर्जेदार शेतरस्त्याचा हक्क : पालकमंत्री विखे पाटील

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शेतकऱ्याला पावसाळा, उन्हाळा आणि हिवाळा अशा तिन्ही ऋतूंमध्ये शेतापर्यंत सहज पोहोचता यावे, यासाठी मजबूत, दर्जे दार आणि कायमस्वरूपी शेतरस्ते उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. याच मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने शेतकऱ्यांच्या हक्काचा लढा अधिक तीव्र केला आहे. या निधीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतरस्त्यांची कामे अधिक वेगाने, दर्जेदार आणि प्रभावी पद्धतीने पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शिव पाणंद रस्त्यांच्या कामांमध्ये कोणत्याही जिल्ह्यावर किंवा भागावर अन्याय होता कामा नये. राज्यातील सर्व कामे समान निकषांवर, समांतर गतीने आणि पूर्ण पारदर्शकतेने झाली पाहिजेत, अशी ठाम मागणी शरद पवळे यांनी केली. एका भागात शेतरस्त्यांची कामे वेगाने सुरू असताना दुसऱ्या भागातील शेतकऱ्यांना त्याच हक्कासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागू नये. प्रत्येक गरजू शेतकऱ्याला समान न्याय, समान संधी आणि मजबूत शेतरस्त्याचा हक्क मिळाला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. लोकप्रतिनिधी, प्रशासन, संबंधित विभाग आणि शेतकरी यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण झाल्यास शिव पाणंद रस्त्यांच्या



कामांना मोठी गती मिळू शकते, असा विश्वासही शरद पवळे यांनी व्यक्त केला. प्रत्येक शेतापर्यंत मजबूत आणि दर्जेदार रस्ता पोहोचल्याशिवाय ग्रामीण विकासाची संकल्पना पूर्ण होणार नाही. त्यामुळे शिव पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण ही केवळ विकासाची योजना नसून शेतकऱ्याच्या हक्काला बळ देणारे महत्त्वाचे पाऊल आहे, अशी ठाम भूमिका महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी व्यक्त केली.

# संत शिरोमणी सावता माळी महाराजांची पुण्यतिथी टाकळी मानूर विद्यालयात साजरी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळीमानूर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळीमानूर येथे संत शिरोमणी सावता माळी महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी विद्यालयातील विज्ञान शिक्षक समीर नरसाळे यांनी संत सावता माळी महाराज यांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सावता माळी महाराज यांचा जन्म, त्यांचे गाव, शेती व कष्टाचे जीवन, कामाप्रती असलेली निष्ठा व प्रामाणिकपणा याबाबत माहिती सांगितली. तसेच संत सावता माळी महाराज आणि पंढरपूरच्या विठ्ठल-पांडुरंगाचे अतूट नाते स्पष्ट केले. भगवान विठ्ठल स्वतः सावता माळी महाराजांना भेटण्यासाठी त्यांच्या शेतात आले, हा भक्ती



आणि कर्मनिष्ठेचा प्रेरणादायी प्रसंग त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला.

प्राचार्य श्री देविदास सोनटक्के यांनी संत सावता माळी महाराजांच्या प्रसिद्ध अभंगातील कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी या ओळींचा संदर्भ देत कष्ट, श्रम आणि कर्मामध्येच ईश्वराचे दर्शन घेण्याचा संतांचा विचार विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. संत सावता माळी महाराज हे केवळ अध्यात्माचे महत्त्व सांगणारे संत नव्हते, तर निसर्गावर प्रेम करावे, मातीशी नाते जपावे, शेती व श्रमाचा सन्मान करावा असा संदेश आपल्या आचरणातून देणारे संत होते. कांदा, मुळा, भाजी यांसारख्या शेतीतील साध्या गोष्टींमध्येही त्यांना विठ्ठलाचे रूप दिसत होते. त्यामुळे निसर्गाची सेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे संवर्धन करावे, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व अध्यक्षीय निवड प्रविण गावडे यांनी केले, अनुमोदन अशोक डोळे यांनी तर आभार प्रदर्शन रुपाली पांढरे यांनी केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर : अशोक भंडारी

## दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद ११० रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे.आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे.या मोफत आरोग्य शिबिरात भंडारी परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स नर्सेस व कर्मचारी निस्वार्थ भावनेने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत.आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले



आरोग्य मंदिर आहे.असे प्रतिपादन उद्योजक अशोक भंडारी यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२६ व्या जन्मदिना निमित्त दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिराचे आयोजन धनलक्ष्मी ट्रेडिंग कंपनी (अहिल्यानगर/नाशिक) व भंडारी परीवाराच्या वतीने करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन उद्योजक अशोक भंडारी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.या याप्रसंगी सौ.सविता भंडारी,पराग भंडारी, सौ. निकीता भंडारी,उद्योजक राजेश भंडारी,सौ.नयना भंडारी,सी.ए सोहन गुगळे,कु. प्रेषिका भंडारी,मानविक भंडारी आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारीया,सतीश लोढा,सुभाष मुनोत,डॉ.आशिष भंडारी,प्रकाश छल्लाणी,वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ.भास्कर जाधव,डॉ.रविंद्र मुथा,डॉ.महेश घुगे आदी उपस्थित होते.

उद्योजक राजेश भंडारी म्हणाले,धावपळीच्या युगामध्ये प्रत्येकाला वेगवेगळ्या आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून विविध आजारांवर उपचार व शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जात आहेत.दररोज पाचशे ते हजार रुग्ण या आरोग्य सेवेचा लाभ घेत आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब जनतेची व समाजाची सेवा घडत आहे.या आरोग्य सेवेच्या महान कार्यात जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य मोठे योगदान देत आहे.व समाजाला भूषणावह असे कार्य करीत आहे.वर्धमान महावीर स्कूल व आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. डॉ.महेश घुगे म्हणाले, हॉस्पिटलमध्ये दुर्बीणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया अत्याधुनिक पद्धतीने व यशस्वीपणे केले जात आहेत.तसेच आतडे,फुफ्फुसे व कॅन्सर या सारख्या आजारांवरील शस्त्रक्रिया दुर्बीणद्वारे केल्या जात आहेत.

# आदिवासी संस्कृती, ज्ञानपरंपरा निसर्गसंवर्धनाची परंपरा जपावी : डॉ. गावित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आदिवासी समाज निसर्गाला लुबाडत नाही, तर निसर्गाशी सहजीवन साधत त्याचे संवर्धन करतो. जल, जंगल, जमीन, नद्या आणि डोंगर यांच्याशी आदिवासी समाजाची अतूट नाळ जोडलेली आहे. धरतीमातेबद्दल कृतज्ञता बाळगणारी आदिवासी संस्कृती ही समृद्ध ज्ञानपरंपरा, जीवनमूल्ये आणि निसर्गसंवर्धनाची शिकवण देणारी परंपरा आहे. ही संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले. ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर यांच्यावतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी प्रतिमा भांगरे, किरण देशमुख, ज्ञानदेव मुकणे, रामभाऊ कचरे, सुरेश रामजी देशमुख, संजय गंभीरे, धुळे येथील गंगाराम तळपाडे, प्रा. भाऊराव नाडेकर, ॲड. लक्ष्मण डामसे, डॉ. पी. डी. गांडाळ, प्रा. डॉ. नितीन तळपाडे, आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक संजय साबळे तसेच संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# मनपा कर्मचारी धीरज परदेशी खून प्रकरणाचा तपास तातडीने मार्गी लावून गुन्हेगारांना कडक शासन करा

## राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाचे एस.पीं.ना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील महानगरपालिका कंत्राटी कर्मचारी स्वर्गीय धीरज परदेशी यांच्यावर काही गुंडांकडून प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास तातडीने पूर्ण करून हल्लेखोर व संबंधित गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून अशा गुन्हेगारी प्रवृत्तींवर कायद्याचा धाक निर्माण होईल आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली.

याबाबत राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष रेश्माताई आठरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका यांना निवेदन देण्यात आले. आ. संग्राम भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

स्वर्गीय धीरज परदेशी हे महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना नागरी सुविधा देण्याचे कर्तव्य बजावत होते. कामावर असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होणे आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर व दुर्दैवी घटना आहे. या घटनेमुळे मनपा कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, अंजली आव्हाड, सारिका खताडे, शारदा जगदाळे, सुरेखा कडूस, शितल गाडे, लता गायकवाड, ललिता पवार, लतिका पवार, निर्मला जाधव, अलिशा गर्जे, युवराज शिंदे, अक्षय भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

# कर्तव्यनिष्ठ सैनिकांमुळेच देशाची सीमा सुरक्षित : आ. राजळे

## सेवानिवृत्त मेजर विष्णू आधाट यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** कर्तव्यनिष्ठ सैनिकांमुळेच आपल्या भारत देशाची सीमा सुरक्षित असून देशवासीय निश्चिंत आहेत. देशातील प्रत्येक नागरिकाला भारतीय सैन्याचा आणि प्रत्येक जवानाचा नितांत आदर आहे, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

जनरल रिझर्व्ह इंजिनियरिंग फोर्स (ऋठएऋ), भारतीय सैन्य दलात प्रदीर्घ काळ देशसेवा बजावून सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झालेले मेजर विष्णू नारायण आधाट यांच्या सेवा पूर्ती निमित्त आयोजित सेवा पूर्ती गौरव समारंभात त्या बोलत होत्या.

स्वराज मंगल कार्यालय, शेवगाव येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मोनिका राजळे होत्या. यावेळी वृद्धेश्वर सहकारी साखर



कारखान्याचे संचालक श्री. उद्धव वाघ, प्रवरा शैक्षणिक समूहाचे कार्यकारी संचालक श्री. पंजाबराव आहेर पाटील यांची सन्माननीय उपस्थिती होती.

तसेच शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष महेश फलके, माजी सैनिक संघाचे तालुकाध्यक्ष विनोद शेळके व उपाध्यक्ष शिवाजीराव बडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक उद्धव वाघ, तहसीलदार आकाश दहाडदे, भाजपाचे तालुकाध्यक्ष महेश फलके आणि माजी सैनिक संघाचे तालुकाध्यक्ष विनोद शेळके यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी मेजर विष्णू आधाट यांच्या प्रदीर्घ देशसेवेचे कौतुक करत त्यांच्या कार्याला सलाम केला आणि पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आ. मोनिका राजळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त मेजर विष्णू आधाट, त्यांच्या पत्नी सौ. विद्या आधाट, मुलगा सार्थक, मुलगी सायली, वडील नारायणराव आधाट आणि आई ठकूबाई आधाट यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.सैनिकाच्या देशसेवेबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाचाही यावेळी गौरव करण्यात आला. मेजर विष्णू आधाट यांनी आपल्या सेवाकाळात देशाच्या विविध भागांत कर्तव्य बजावत राष्ट्रसेवेत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि समर्पित सेवेला उपस्थित मान्यवरांनी सलाम करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश रांधवणे यांनी केले. त्यांनी मेजर विष्णू आधाट यांच्या सैन्य सेवेचा प्रवास आणि देशसेवेसाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सूत्रसंचालन प्रा. दीपक कुसळकर यांनी केले, तर आभार प्रा. मच्छिंद्र आधाट यांनी मानले.

कार्यक्रमास शेवगाव तालुका माजी सैनिक सेवा संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच डॉ. सोमनाथ आधाट, प्रविण आधाट, सागर आधाट, अंबादास आधाट, डॉ. किरण वाघ, रमेश लव्हाट, ॲड. अतिष लांडे, दीपक भडके, जनार्दन रायकर, ठकसेन तुपे, अशोक गोरे, नामदेव चेडे, कैलास बाहेती, राहुल सावंत, राहुल नांगरे, विजय काथवटे, खंडू बुलबुले, नगरसेवक गणेश कोरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

शेवगाव सायकल असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच शेवगाव स्पोर्ट्स क्लबचे आजी-माजी खेळाडू यांचीही उपस्थिती होती. आजी-माजी सैनिक, आधाट परिवार, मित्रपरिवार, नातेवाईक, क्रीडा क्षेत्रातील खेळाडू तसेच नागरिकांची उपस्थिती होती.

# रुग्णवाहिकांचे सुधारित भाडेदर लागू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या पुणे, पिंपरी-चिंचवड व बारामती कार्यक्षेत्रातील रुग्णवाहिकांसाठी सुधारित भाडेदर लागू करण्यात आले आहेत. रुग्णवाहिकेत रुग्ण बसल्यापासून परतीच्या अंतरासाठी हे भाडेदर लागू राहणार आहेत. निश्चित करण्यात आलेल्या दरपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी न करणाऱ्या वाहनमालक व चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, अशी माहिती प्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिली.

सुधारित दरपत्रकानुसार अवातानुकुलीत मारुती व्हॅनसाठी २५ किलोमीटर अथवा दोन तासांसाठी ७०० रुपये, त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी १६ रुपये आणि प्रतीक्षा शुल्क १२५ रुपये प्रतितास आकारता येईल. प्रतिदिन अथवा ३०० किलोमीटरसाठी ४ हजार रुपये दर निश्चित करण्यात आला असून, इंधन, देखभाल, दुरुस्ती व चालकाचा खर्च वगळून १ हजार रुपये प्रतिदिन दर राहणार आहे. अवातानुकुलीत मारुती ईको व टाटा मॅजिकसाठी २५ किलोमीटर अथवा दोन तासांसाठी ९०० रुपये, त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी १७ रुपये आणि प्रतीक्षा शुल्क १२५ रुपये प्रतितास राहील. प्रतिदिन अथवा ३०० किलोमीटरसाठी ४ हजार ५०० रुपये, तर इंधन, देखभाल, दुरुस्ती व चालकाचा खर्च वगळून १ हजार २०० रुपये प्रतिदिन दर निश्चित करण्यात आला आहे.

अवातानुकुलीत महिंद्रा बोलेरो व फोर्स क्रुझरसाठी २५ किलोमीटर अथवा दोन तासांसाठी १ हजार २०० रुपये, त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी १८ रुपये आणि प्रतीक्षा शुल्क १५० रुपये प्रतितास आकारता येईल. प्रतिदिन अथवा ३०० किलोमीटरसाठी ५ हजार रुपये, तर इंधन, देखभाल, दुरुस्ती व चालकाचा खर्च वगळून १ हजार ५०० रुपये प्रतिदिन दर राहील.

अवातानुकुलीत फोर्स टेम्पो ट्रॅव्हलरसाठी २५ किलोमीटर अथवा दोन तासांसाठी १ हजार ५०० रुपये, त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी २२ रुपये आणि प्रतीक्षा शुल्क १७५ रुपये प्रतितास निश्चित करण्यात आले आहे. प्रतिदिन अथवा ३०० किलोमीटरसाठी ७ हजार रुपये, तर इंधन, देखभाल, दुरुस्ती व चालकाचा खर्च वगळून २ हजार रुपये प्रतिदिन दर राहणार आहे.

वातानुकुलीत फोर्स टेम्पो ट्रॅव्हलर (आयसीयू) साठी २५ किलोमीटर अथवा दोन तासांसाठी २ हजार ५०० रुपये, त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी ३० रुपये आणि प्रतीक्षा शुल्क २५० रुपये प्रतितास राहील. प्रतिदिन अथवा ३०० किलोमीटरसाठी १० हजार रुपये, तर इंधन, देखभाल, दुरुस्ती व चालकाचा खर्च वगळून ४ हजार रुपये प्रतिदिन दर निश्चित करण्यात आला आहे.

निश्चित केलेल्या भाडेदरापेक्षा अधिक भाडे आकारणाऱ्या वाहनमालक व चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. पहिल्या गुन्ह्यासाठी ५ हजार रुपये, दुसऱ्या गुन्ह्यासाठी १० हजार रुपये, तर तिसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी २० हजार रुपये दंड आकारण्यात येईल, असेही प्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी स्पष्ट केले.

## दखल

### कृषी विभागाचा २९ वर्षांनी सुधारित आकृतिबंध मंजूर

**पुणे :** राज्याच्या कृषी विभागाच्या प्रशासकीय संरचनेत तब्बल २९ वर्षांनी मोठे बदल करण्यात आले आहेत. कृषी विभागाचा सुधारित आकृतिबंध राज्य मंत्रिमंडळाने मंजूर केला असून, बदलत्या कृषी क्षेत्राच्या गरजांनुसार विभागाची प्रशासकीय रचना अधिक सक्षम आणि गतिमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कृषी विभागाच्या प्रशासकीय संरचनेत यापूर्वी १९९७ मध्ये सुधारणा करण्यात आली होती. त्यानंतर प्रथमच व्यापक स्वरूपात सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे.

या नव्या आकृतिबंधात ॲग्रीस्टॅक, कृषी अभियांत्रिकी, पीक कापणीनंतरचे व्यवस्थापन (पोस्ट-हार्वेस्ट मॅनेजमेंट) आणि मालमत्ता व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या व उदयोन्मुख क्षेत्रांसाठी स्वतंत्र संचालनालये स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच प्रशासकीय उतरंडीत सुसूत्रता आणणे, निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान करणे आणि आस्थापना, पदोन्नती, पदस्थापना व पर्यवेक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल करण्यावर भर देण्यात आला आहे.

बदलत्या काळातील कृषी क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला हा सुधारित आकृतिबंध कृषी विभागासाठी नव्या युगाची सुरुवात ठरेल. यामुळे शेतकऱ्यांप्रती असलेली विभागाची बांधिलकी अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास बळ मिळेल, असा विश्वास कृषी विभागाचे आयुक्त सूरज मांढरे यांनी व्यक्त केला.

### जांबुत शाखेची बॉण्ड वितरणात विक्रमी कामगिरी



**शिरूर :** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जांबुत शाखेने बॉण्ड वितरणात विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. सुरक्षित गुंतवणुकीला ग्राहकांकडून मिळणारा प्रतिसाद आणि बँकेवरील विश्वास यामुळे शाखेने आतापर्यंत विविध संस्था व खातेदारांना तब्बल ७ कोटी ९३ लाख १० हजार रुपयांचे बॉण्ड्स वितरित केले आहेत.नुकतेच जांबुत शाखेच्या वतीने विशाल जुन्नर पतपेढीला दोन कोटी रुपयांचे बॉण्ड्स वितरित करण्यात आले. यामध्ये जांबुत ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेला पाच कोटी रुपये, विशाल जुन्नर पतपेढीला दोन कोटी रुपये, शरदचंद्र नगरी सहकारी पतसंस्थेला ५० लाख रुपये, अंबिका ग्रामीण पतसंस्थेला २५ लाख रुपये, व्यक्तिगत खातेदारांना २० लाख रुपये, तर इतरांना १८ लाख १० हजार रुपयांचे बॉण्ड्स वितरित करण्यात आले आहेत.शाखाप्रमुख भरत तंबारे म्हणाले, ग्राहकांचा बँकेवरील विश्वास ही शाखेची खरी ताकद आहे. सुरक्षित गुंतवणुकीसोबत ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यावर शाखेचा भर आहे. बॉण्ड वितरणातील ही कामगिरी शाखेतील कर्मचाऱ्यांचे परिश्रम, उत्कृष्ट टीमवर्क आणि ग्राहकांचा विश्वास यांचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले.यापुढेही ग्राहकांना विश्वासार्ह व दर्जेदार सेवा देण्यासाठी जांबुत शाखा कटिबद्ध असल्याचे तंबारे यांनी स्पष्ट केले.

### जारकरवाडीत बिबट्याची दहशत; पिंजरा लावण्याची शेतकऱ्यांची मागणी

**लोणी धामणी :** जारकरवाडी (ता. आंबेगाव) परिसरात बिबट्याने दहशत माजवली असून, दिवसाढवळ्या शेळीवर हल्ला करून तिला ठार केल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने या परिसरात तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शरद पतसंस्थेचे उपाध्यक्ष रविंद्र काकडे व शेतकरी सूरज लबडे यांनी केली आहे. जारकरवाडी येथील डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यालगत लबडे मळा आहे. येथील शेतकरी सूरज लबडे यांची शेळी दि. १० ऑगस्ट रोजी दुपारी कालव्यालगत चरत असताना बिबट्याने दिवसाढवळ्या तिच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात शेळी ठार झाली असून, लबडे यांचे सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.दरम्यान, दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी शेतकरी मच्छिंद्र पिंगळे हे शेतात काम करत असताना शेजारील शेतातून बिबट्याच्या डरकाळीचा आवाज ऐकू आला.

त्यामुळे घाबरलेल्या पिंगळे यांनी शेतातून तातडीने सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी, महिला व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याचा वावर दिवसाढवळ्या वाढल्याने शेतकऱ्यांच्या जीवितासह पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वनविभागाने विलंब न करता घटनास्थळी पाहणी करून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तातडीने पिंजरा लावावा, अशी जोरदार मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून होत आहे.

### फेसलेस लर्निंग लायसन्स परीक्षेत सूचनांचे पालन करा

**पुणे :** फेसलेस लर्निंग लायसन्ससाठी ऑनलाइन परीक्षा देताना अर्जदारांनी आवश्यक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे. आधारकार्डवरील छायाचित्राशी चेहऱ्याची पडताळणी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणालीद्वारे केली जात असल्याने परीक्षा देताना चेहरा स्पष्ट दिसणे आवश्यक आहे. फेसलेस लर्निंग लायसन्स प्रक्रियेत अर्जदाराने पुरेशा प्रकाशात, शांत आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय ऑनलाइन परीक्षा पूर्ण करणे आवश्यक आहे. परीक्षा सुरू असताना आजूबाजूला अन्य व्यक्ती नसावी. तसेच अनावश्यक हालचाल, आवाज किंवा अन्य व्यक्तींकडून मदत घेणे टाळावे. एआय प्रणालीद्वारे डोळ्यांची हालचाल (ब्लिंक डिटेक्शन) आणि चेहऱ्याची ओळख यासह विविध बाबींची पडताळणी केली जाते.

# कडेठान गावात १५ ऑगस्टला उपोषण

## दौंड तालुक्यात सरकारी गायराने घ्या आणि खुशाल राहा भयावह वास्तव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**दौंड –** उपोषण होणार म्हणजे होणारच! तुम्ही काहीही करा, वाटेत अडवा किंवा जेलमध्ये टाका, आमचं उपोषण होणारच, असं रणशिंग फुंकून कडेठान येथील उपोषणकर्ते विठ्ठल दिवेकर दादासो दिवेकर व समस्थ ग्रामस्थ यांनी स्वातंत्र्यदिनी उपोषणाचा प्रशासनाला निवेदन देऊन इशारा दिला आहे.

कडेठान ( ता. दौंड ) येथील गायरान व फॉरेस्ट जमीन गट क्रमांक १५२/ ६२५/८, ६८२/ ६८३/६९०/६९१/ या गट क्रमांक जमिनीवर धनदांडग्यांच्या वाढत्या अतिक्रमणांमुळे त्रस्त झालेल्या गावकऱ्यांनी याअगोदर दोन वेळा उपोषणाचे हत्यार उपसले आहे. मात्र, यावर ठोस कारवाई करण्याऐवजी वन विभागाकडून वारंवार कानाडोळा व चालढकल केली जात असल्याचे चित्र कडेठान येथे पाहायला मिळते. उपोषणकर्ते विठ्ठल दिवेकर, दादासो दिवेकर व समस्थ ग्रामस्थ यांनी दोन वेळा उपोषण करुनही वन अधिकारी बेकायदेशीर अतिक्रमण काढण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. महाराष्ट्र शासन निर्णयानुसार वन अधिकाऱ्यांना अतिक्रमण हटविण्यासाठी महसूल अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तरीही अंमलबजावणी सुस्तावलेली असते. पण शासनाचे कायदे हे गोर गरीब नागरिक यांच्यावर लागू होतात. अशा प्रकारे गैरकृत्य करणाऱ्या धनदांडग्यांना मात्र, जावया सारखा पाहुणचार केला जातो, हे आजची काळातील सत्य परिस्थिती आहे. नेहमीप्रमाणे वरचे अधिकारी मलिदा खायचा आणि अंगावर शेकल्यानंतर लहान कर्मचाऱ्यांच्या माथी मारायचे हा वनविभागाचा जुना पॅटर्न येथेही राबवला जात आहे.

मात्र, यावेळी उपोषणकर्त्यांनी व ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. अतिक्रमण विरोधात दोन वेळा कडेठान ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण सुरू होते. परंतु वन अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर हे उपोषण तात्पुरते स्थगित केले. आजपर्यंत फक्त आश्वासनांचा नावाखाली फक्त कागदी घोडे उपोषणकर्त्यांच्या पुढे नाचवले. यापलिकडे वन विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. कारवाई होत नसल्याने ग्रामस्थ आता आक्रमक झाले आहेत. येत्या १५ ऑगस्ट २०२६ पासून ग्रामस्थांनी कडेठान ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचे निवेदन दौंड वन परिक्षेत्र अधिकारी राहुल काळे, जिल्हाधिकारी पुणे, यवत पोलीस स्टेशन, तहसीलदार, ग्रामपंचायत कडेठान यांना निवेदनाद्वारे कळविण्यात आले असल्याची माहिती उपोषणकर्ते विठ्ठल दिवेकर, दादासो दिवेकर व समस्थ यांनी सांगितले. दौंड वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांच्याशी यासंदर्भात वेळोवेळी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.



# हिंदीतून रोजीरोटी, मराठीची सेवा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** हिंदी विषयातून उपजीविका करत असतानाही मातृभाषा मराठीची निष्ठेने सेवा करणारे डॉ. सुभाष तळेकर यांचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघीरे महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. सुभाष तळेकर यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमात डॉ. सबनीस बोलत होते. ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार, माजी प्राचार्य डॉ. मुकुंद तापकीर आणि शाहीर दादा कोंडके प्रतिष्ठानचे मनोहर कोलते उपस्थित होते.

डॉ. सबनीस यांनी तळेकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्याचा गौरव करत कुटुंबीयांसह त्यांचा सत्कार केला. डॉ. शिवाजीराव ढगे, ह.भ.प. पुनम महाराज कोलते, डॉ. बेबी कोलते, मनोहर कोलते, रावसाहेब पवार, ॲड. अण्णासाहेब खाडे, नीता शिवले, अभिजित जगताप आणि डॉ. मुकुंद तापकीर यांनी शुभेच्छा दिल्या.

अमृत महोत्सवानिमित्त डॉ. तळेकर यांनी हनुमानवाडी शाळेला शैक्षणिक साहित्याकरिता पाच हजार रुपये, तसेच गरीब व दिव्यांग विद्यार्थी राजाराम गांधीले याला पाच हजार रुपयांची मदत केली. मनोहरी मैत्र संघाच्या वतीने मनोहर कोलते यांनी 'आचार्य अत्रे स्मरणार्थ मातृभूमी सेवा पुरस्कार' जाहीर केला.

प्रा. हरिदास खेसे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सागर तळेकर यांनी आभार मानले. कांचन तळेकर, डॉ. राहुल तळेकर, सोनाली तळेकर, वर्षा तळेकर आणि सिद्धी तळेकर यांनी आयोजन केले.

# टेम्पोच्या धडकेत हॉटेल कामगाराचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील शिक्रापूर-चाकण रस्त्यावर हॉटेल चंद्रमा समोर रस्ता ओलांडताना टेम्पोची धडक बसल्याने हॉटेल कामगाराचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताराचंद उत्तम राठोड (वय ४७, सध्या रा. शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे, मूळ रा. मुंगशी, ता. पुसद, जि. यवतमाळ) हे हॉटेल चंद्रमा येथे काम करत होते. ते हॉटेलसमोरून रस्ता ओलांडत असताना शिक्रापूरहून चाकणच्या दिशेने जाणाऱ्या एमएच १४ केए ०२९५ क्रमांकाच्या टेम्पोचालकाने समोरील वाहनाला ओव्हरटेक करताना विरुद्ध बाजूने येऊन राठोड यांना धडक दिली. धडकेनंतर ते रस्त्यावर पडले. त्यावेळी टेम्पोचे चाक डोक्यावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस शिपाई पवन मते व सुशील माने यांनी घटनास्थळी धाव घेत टेम्पोचालकाला ताब्यात घेतले. याबाबत अमर हनुमान शिंदे (वय २६, सध्या रा. शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे, मूळ रा. ढालेगाव, ता. पाथरी, जि. परभणी) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार टेम्पोचालक धनंजय सोपान भीवरे (रा. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार बापू हाडगळे करत आहेत.



# 'आडतास'ला विद्यापीठाची मोहोर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** सुपे (ता. बारामती) येथील कवी व गीतकार हनुमंत चांदगुडे यांच्या 'आडतास' या काव्यसंग्रहाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या एम.ए. मराठी अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सुपेसह बारामतीच्या साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

**एम.ए. मराठी अभ्यासक्रमात समावेश**

विद्यापीठाच्या एम.ए. मराठी अभ्यासक्रमातील 'साहित्यनिर्मिती प्रक्रिया, साहित्यनिर्मितीचे सिद्धांत-व्यवहार आणि स्वरूप' या अभ्यासघटकासाठी 'आडतास' या काव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव आणि मानवी भावभावनांचे प्रभावी चित्रण या काव्यसंग्रहातून करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, 'आडतास'मधील 'लेक' या कवितेचा यापूर्वीच एफ.वाय.बी.ए.च्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. आता संपूर्ण काव्यसंग्रहाचा एम.ए. मराठीच्या अभ्यासक्रमात समावेश झाल्याने हनुमंत चांदगुडे यांच्या साहित्यिक कार्याला विद्यापीठीय अभ्यासक्रमाची महत्त्वपूर्ण दखल मिळाली आहे.



तळेगाव ढमढेरे येथे प्रवीणकुमार जगताप यांना प्रा.हरी नरके पुरस्कार प्रदान करताना मान्यवर. (छायाचित्र आकाश भोरडे)

# पर्यावरण क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रवीणकुमार जगताप यांना प्रा. हरी नरके पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर :** क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले विचार मंचच्या वतीने सामाजिक विषयाचे अभ्यासक स्व. प्रा. हरी नरके यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी पर्यावरण क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल प्रवीणकुमार जगताप यांना प्रा. हरी नरके पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तळेगाव ढमढेरे येथील उपबाजार आवारातील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सावता माळी मंगल कार्यालयात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्व. प्रा. हरी नरके यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी संत साहित्याचे अभ्यासक संभाजी गदादे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची माहिती दिली.

# उलट्यांच्या त्रासाने महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर** तळेगाव ढमढेरे येथील २० वर्षीय महिलेचा उलट्या, ताप व थंडीच्या त्रासामुळे उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

तनुजा गोविंद कांबळे (वय २०, रा. तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे) हिला सकाळच्या सुमारास थंडी, ताप व उलट्यांचा त्रास सुरू झाला. कुटुंबीयांनी तिला प्रथम तळेगाव ढमढेरे येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी शिक्रापूर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला.

याबाबत गोविंद दत्तू कांबळे (वय २४, सध्या रा. तळेगाव ढमढेरे, मूळ रा. हिंगणगाव, ता. परांडा, जि. धाराशिव) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात खबर दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार अमोल चव्हाण करीत आहेत.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की, गिरीश एकनाथ कोठावदे मुक्काम पोस्ट फ्लॅट नंबर ५, ङ विंग, गणेश नगरी, म्हाळसाकांत चौकाजवळ, सेक्टर नंबर २८, आकुर्डी पुणे ४११०३५

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-14 -LT-2540 असे असून त्याचा इंजिन नंबर २७५६५, चासी नंबर ८८९१४ असा असून सदर दोन चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती शुभांगी गिरीश कोठावदे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-१२/०८/२०२६

**श्रीमती शुभांगी गिरीश कोठावदे**
मुक्काम फ्लॅट नंबर ५, ङ विंग , गणेश नगरी, म्हाळसाकांत चौकाजवळ, सेक्टर नंबर २८ आकुर्डी पुणे ४११०३५.

# भीमा पुलावरील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** दौंड-सांगली-मनमाड राष्ट्रीय महामार्गावरील भीमा नदीच्या पुलावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

पुलावरून दररोज हजारो वाहने धावत असून खड्डे चुकविताना वाहनचालकांना अचानक ब्रेक लावावे लागत आहेत. परिणामी पाठीमागून येणाऱ्या वाहनांची धडक होऊन अपघात होण्याची शक्यता आहे. सोनवडी हद्दीतील टोलनाक्याच्या टोल फ्री क्रमांकावर याबाबत अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायत समिती, दौंडचे माजी अध्यक्ष गणेश जगताप यांनी केला आहे.रस्ता सुरक्षित नसेल तर टोल कशासाठी, असा सवाल करत पुलावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करून वाहनचालकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा द्यावी, अशी मागणी जगताप यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



**भीमा नदीच्या पुलावर, आणि सोनवडी हद्दीतील सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्यावर पडलेले खड्डे तीन ते चार दिवसांत बुजवून प्रवाशांना दिलासा दिला जाईल.**

**– पवन चौधरी,**
**मेंन्टनस मॅनेजर राष्ट्रीय महामार्ग**

**ठेकेदार आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचा फटका सामान्य नागरिकांना व वाहनचालकांना बसत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे. रस्त्यावर खड्डे म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. चार दिवसांत खड्डे बुजवून प्रवाशांना दिलासा दिला नाही तर आंदोलन करणार**

**– गणेश जगताप, अखिल भारतीय ग्राहक पंचायत**
**दौंड शहर माजी अध्यक्ष.**

**जाहीर नोटीस** श्री. मजीद महंमद मुलाणी, वय ७० वर्षे, व्यवसायः मोलमजुरी, रा. राजेंगाव, ता. दौंड, जि. पुणे येथील कायमचा रहिवासी आहेत. माझा जन्म दिनांक २३/०५/१९५६ रोजी राजेंगाव, ता. दौंड, जि. पुणे येथे झालेला आहे. त्या वेळी नजरचुकीने व अज्ञानामुळे ग्रामपंचायत कार्यालय, राजेंगाव येथे वेळेत नोंद केली गेली नाही. परंतु, माझी जन्म नोंद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राजेंगाव येथील सापडली आहे मूळ शाळेच्या दाखल्यावर जन्म दिनांक २३/०५/१९५६ रोजी राजेंगाव येथेच झाल्याचे स्पष्ट नमूद आहे व सदर जन्म तारीख पूर्णपणे खरी व अचूक आहे याची मला खात्री आहे.

मी जन्म नोंदीचा दाखला मिळण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय, राजेंगाव व मा. उपविभागीय अधिकारी साहेब दौंड यांच्याकडून जन्म नोंदीचा कायदेशीर आदेश प्राप्त करून घ्यावयाचा आहे या साठी सदरील मजकूर प्रसिद्ध करत आहे.

सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझी दिनांक २३/०५/१९५६ रोजी राजेंगाव येथे झालेल्या जन्म नोंदीबाबत तसेच मा. उपविभागीय अधिकारी, दौंड यांच्याकडून जन्म नोंदीचा आदेश मिळण्याबाबत कोणाचीही काहीही हरकत, आक्षेप किंवा तक्रार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर किंवा कार्यालयात लेखी पुराव्यानिशी संपर्क साधावा.

दिनांकः ११/०८/२०२६
ठिकाणः मु.पो - राजेंगाव, ता-दौंड, जि-पुणे **श्री. मजीद महंमद मुलाणी**

# आ. पाचपुतेंच्या जनता दरबाराला जनसागर!

## प्रश्नांचा पाऊस, सोडवणुकीसाठी जनतेचा आमदारांवर विश्वास

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** नागरिकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या आमदार विक्रम पाचपुते यांच्या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. श्रीगोंदा शहरातील माऊली निवासस्थानी झालेल्या या जनता दरबारात तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. जनता दरबारातील गर्दीने यापूर्वीचे उच्चांक मोडल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.



आपल्या अडचणी आणि प्रलंबित प्रश्न घेऊन आलेल्या नागरिकांनी आमदार पाचपुते यांच्यासमोर थेटपणे समस्या मांडल्या. विविध शासकीय विभागांशी संबंधित अनेक प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आले. नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना आमदार पाचपुते यांनी दिल्या. विशेष म्हणजे, 'आपला प्रश्न थेट आमदारांपर्यंत पोहोचतो आणि त्यावर कार्यवाही होते,' असा विश्वास अनेक नागरिकांनी यावेळी व्यक्त केला. त्यामुळे जनता दरबार हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त झाली.

जनता दरबारात आलेल्या नागरिकांमध्ये महिला, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच विविध गावांतील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. राजकीय पक्षाचा विचार न करता नागरिकांनी आपल्या समस्या मांडाव्यात, या आवाहनाला प्रतिसाद देत विविध स्तरातील नागरिकांनी उपस्थिती लावली.

**प्रश्न अनेक; अपेक्षा एकच-काम मार्गी लागावे!**

रस्ते, पाणी, वीज, महसूल, शेती, शासकीय योजना, स्थानिक विकासकामे यांसह विविध विषयांवरील प्रश्न जनता दरबारात मांडण्यात आले. नागरिकांनी थेट संवाद साधत आपल्या समस्या मांडल्याने प्रशासन आणि जनता यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न या माध्यमातून झाल्याचे दिसून आले. दरम्यान, जनता दरबाराला मिळालेली मोठी गर्दी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहता आमदार पाचपुते यांच्या कामकाजाबाबत जनतेत विश्वासाचे वातावरण असल्याचे चित्र दिसून आले. आता मांडण्यात आलेल्या प्रश्नांपैकी किती प्रश्न किती वेगाने मार्गी लागतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# द•ख•ल

## बाळनाथ गडावर २०० झाडांचे वृक्षारोपण



**करंजी :** बाळनाथ गड ता. नगर येथे वै. हभप संतचरणरज छगन महाराज मालुसरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'नगरी फॉर नेचर' आणि 'डॉ. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुप' यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत बाळनाथ गडावर वड, पिंपळ, कडुनिंब व उंबर या देशी वृक्षांच्या १२५ रोपांची, तर शेंडी येथे ७५ रोपांची लागवड करण्यात आली. अशा एकूण २०० देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. देशी वृक्षांचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि भावी पिढ्यांसाठी पर्यावरण समृद्ध ठेवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या रोपांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारीही आयोजकांनी स्वीकारली आहे. त्यामुळे बाळनाथ गड व परिसराच्या सौंदर्यात आणि पर्यावरणीय समृद्धीत भर पडणार आहे. या उपक्रमात ग्रामीण आरोग्य अधिकारी डॉ. सचिन दरंदले, सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी उबरहांडे, धर्मराज गुंड, विद्या गुंड, महेश कुलकर्णी, शुभांगी कुलकर्णी, शिव माचवे, माया माचवे, सुप्रिया व उद्धवराज टेमकर, मंजुषा दिवसे, प्रिया उबरहांडे, राजेश उदमले, विशाल पांचारिया यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. प्रा. विजय कांडके यांच्या सहकार्याने उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. प्राचार्य दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांनीही वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## समर्थ आय. टी. आय. कॉलेजचा शंभर टक्के निकाल

**शेवगाव :** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान संगमनेर संचालित, समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था राक्षी तालुका- शेवगाव जि. अहमदनगर येथील वार्षिक प्रात्यक्षिक व उइढ परीक्षा जून जुलै-२०२६ चा निकाल नुकताच लागला असून प्रथम वर्षाचा निकाल १००% तर द्वितीय वर्षाचा निकाल ९७ % लागला आहे. तसेच विद्यार्थ्यांची परीक्षे आधीच कॅम्पस प्लेसमेंट मधून नामंकित कंपनीमध्ये निवड झाली आहे अशी माहिती संस्थेचे कार्यकारी अधिकारी प्रा. श्रीकांत ढाकणे यांनी दिली. सर्व व्यवसाय निदेशक यांनी खास मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचे १००% प्रॅक्टिकल व नियमित तासिका, तसेच ऑनलाईन सराव परीक्षा ,घेऊन अधिकाधिक सराव करून घेतला ,त्याचाच परिपाक म्हणजे विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये मिळवलेले दैदिप्यमान यश असे मत संस्थेचे अध्यक्ष मा. एकनाथराव ढाकणे यांनी व्यक्त केले. यावेळी एकनाथ ढाकणे, श्रीकांत ढाकणे. जया रहाणें, ऋषिकेश ढाकणे, डॉ .आर.एच आत्तार प्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वच स्तरावरून कौतुक होत आहे.

## ऋषिकेश अंधारे इंडिगो कंपनीत पायलट

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील ऋषिकेश कैलास अंधारे यांनी आपल्या मेहनत, जिद्द, चिकाटीच्या जोरावर सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर विमान क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांची देशातील नामांकित इंडिगो ( खपवळऋे ) विमान कंपनीत



पायलट म्हणून निवड झाली आहे. ऋषिकेश अंधारे यांनी वैमानिक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण व शिक्षण पूर्ण केल्याने त्यांच्या मेहनतीला अखेर यश मिळाले असून, त्यांच्या या यशाने ग्रामीण भागातील युवकांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. त्यांच्या या निवडीमुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ऋषिकेश अंधारे यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही विमान क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शेवगाव रोटरीला प्रथम क्रमांक



**शेवगाव :** रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील १०९ रोटरी क्लबच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ते आयोजित 'अचिव्हर्स अवॉर्ड्स २०२५-२६'मध्ये रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीने दुहेरी यश मिळविले. 'अंधमुक्त व्हिलेज' संकल्पनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या नेत्रसेवा आणि नेत्रतपासणी शिबिरांच्या उल्लेखनीय कार्यासाठी क्लबला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

# स्वातंत्र्यानंतर प्रथमच जांभूळवाडीचा अंधार दूर

## वीज रोहित्राचे सुजित झावरे यांच्या हस्ते भूमिपूजन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** स्वातंत्र्यानंतरही अंधारात राहणाऱ्या आदिवासी वस्तीत वीज पोहोचवणे आद्य कर्तव्य होते.पारनेर तालुक्यातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी कायम अग्रेसर राहू असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी केले.

खडकवाडी येथील जांभूळवाडी येथे जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून ४० लक्ष रुपये खर्चाच्या ७० पोल विद्युतीकरणासह नवीन वीज रोहित्राचे (ट्रान्सफॉर्मर) भूमिपूजन मा. सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पिढ्यानपिढ्या अंधारात राहिलेल्या या वस्तीला अखेर प्रकाशाची नवी वाट सापडली आहे.पारनेर तालुक्यातील अतिदुर्गम आणि आदिवासी भाग मानल्या जाणाऱ्या जांभूळवाडीसाठी विकासाचे काम मंजूर होणे हे खऱ्या अर्थाने एक क्रांतिकारी घटना आहे.या कामामुळे येथील आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्यास आणि त्यांच्या दैनंदिन अडचणी दूर होण्यास मोठी मदत होणार आहे. सुजित झावरेयांनी नेहमीच आदिवासी भाग आणि ग्रामीण शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे व निष्ठेने काम करत आले आहेत.मूलभूत सुविधांवर भर: वीज जोडणी आणि सिंचनाच्या सुविधा तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्यांचे अथक प्रयत्न सुरु आहेत.

यावेळी अमोल साळवे, बाळासाहेब शिंदे, दिलीप पाटोळे, रावसाहेब आग्रे, प्रदीप ढोकळे, शिवाजी शिंगोटे, चेतन गागरे, राजू इघे, शरद गागरे, शिवाजी गागरे, मच्छिंद्र गागरे, संदीप ढोकळे, बाबासाहेब गागरे, पप्पू खामकर, सचिन ढोकळे, संतोष ढोकळे, बबन चौधरी, बाळू गागरे, बाबासाहेब गागरे, विशाल गागरे, राजू रोकडे, धोंडिभाऊ शिंगोटे, संतोष शिंदे, अर्जुन केदार, सिलाबाई केदार, निवृती पथवे, मनोज चिकणे, शंकर केदार,ठका केदार, रामदास केदार, पोपट केदार, लिंबा जाधव,किसन केदार, आनंदा केदार, काशिनाथ केदार, बबन केदार, शंकर जाधव, हिरामण केदार, गंगाराम केदार,विष्णू जाधव,बाळू केदार व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अनलॉग पनीरवर राज्यात एक वर्षासाठी बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या पनीर मुळे ग्राहकांच्या आरोग्याला निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन आमदार विक्रम पाचपुते यांनी याबाबत विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केल्यावर अन्न व औषध प्रशासनाने अनलॉग पनीरवर संपूर्ण महाराष्ट्रात एक वर्षासाठी बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असल्याचे मत आमदार ॲड. विक्रम बबनराव पाचपुते यांनी व्यक्त केले.



श्रीगोंद्याचे धडाडीचे आमदार विक्रम पाचपुते यांनी पनीरबाबत विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केल्यावर राज्य सरकारने त्याची गंभीरपणे दखल घेतली असून अन्न व औषध प्रशासनाने अनलॉग पनीरवर संपूर्ण महाराष्ट्रात एक वर्षासाठी बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे ग्राहकांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अनलॉग पनीरसारख्या पर्यायी व निकृष्ट उत्पादनांमुळे प्रामाणिक दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम होऊ नये, यासाठीही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड नको आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य न्याय मिळाला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने घेतलेला हा निर्णय महाराष्ट्रातील ग्राहक व दूध उत्पादकांसाठी दिलासादायक असल्याचे आमदार पाचपुते यांनी सांगितले.या निर्णयाबद्दल महाराष्ट्रातील सर्व ग्राहक आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अन्न व औषध प्रशासन तसेच संबंधित प्रशासनाचे आमदार पाचपुते यांनी मनःपूर्वक आभार मानत अभिनंदन केले.

# अपघाती मृत्यू झालेल्या विधाटे कुटुंबाला बेलवंडी पतसंस्थेचा १२ लाखांचा आधार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथील राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने गौरविलेल्या बेलवंडी व्यापारी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे सभासद तसेच कर्जदार दत्तात्रय लक्ष्मण ईधाटे यांचे आठ महिन्यापूर्वी अपघाती निधन झाले होते. त्यांच्या कुटुंबीयांना पतसंस्थेने घेतलेल्या विमा संरक्षणामुळे १२ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे. या विम्याच्या रकमेचा धनादेश मयत दत्तात्रय विधाटे यांच्या पत्नी मनीषा दत्तात्रय विधाटे व मुलगी सुषमा दत्तात्रय ईधाटे यांच्याकडे पतसंस्थेचे चेअरमन उत्तम डाके यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.




बेलवंडी व्यापारी पतसंस्था आपल्या सभासद, ठेवीदार व कर्जदारांना विमा संरक्षण देत असून, सभासदाच्या कुटुंबावर अचानक संकट ओढवल्यास त्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. दत्तात्रय ईधाटे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला जवळपास १२ लाख रुपयांची मदत मिळाली असल्याचे पतसंस्थेचे चेअरमन उत्तम डाके यांनी बोलताना सांगितले. तर सचिव किसन वऱ्हाडे यांनी सांगितले की, पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद, ठेवीदार व कर्जदारांचा विमा उतरविला जातो. त्यामुळे एखाद्या सभासदाचा अपघात अथवा दुर्दैवी घटना घडल्यास संबंधितांनी तात्काळ पतसंस्थेशी संपर्क साधावा. विमा प्रक्रियेसाठी आवश्यक ती सर्व मदत पतसंस्थेच्या माध्यमातून केली जाईल. या प्रसंगी चेअरमन उत्तम डाके, संचालक सोपान हिरवे, युवराज पवार, विठ्ठल लोखंडे, सचिव किसन वऱ्हाडे, अर्जुन हिवरकर, अनिल शेलार, सचिन भोसले, संपत हिरवे, राजू साळवे, राजाराम खलाटे, संदीप लबडे, आशा दरवडे, मनीषा इधाटे, सुषमा इधाटे, प्रविण खेडकर, विनोद जाधव यांच्यासह पतसंस्थेचे सभासद उपस्थित होते.

# तुमच्या मतांची आम्हाला भीक नको आरोपींचे मुंडके छाटले पाहिजे : आ. कर्डिले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** धीरज परदेशी मृत्यू प्रकरणातील आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर झालेल्या आंदोलनात आमदार अक्षय कर्डिले यांनी आक्रमक भूमिका घेतली. आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी करताना आरोपी अटक होत नसतील तर आम्हाला सांगा आम्ही धरून आणू असे म्हणत त्यांनी संताप व्यक्त केला. तुमच्या मतांची आम्हाला गरज नाही. तुमच्या मतांची भीक नको अशा शब्दांत आंदोलनाला राजकीय रंग देणाऱ्यांनाही त्यांनी सुनावले.



धीरज परदेशी यांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या आरोपींवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी करत आ. कर्डिले म्हणाले आरोपींना गजाआड करण्याची गरज आहे. असे कृत्य करणाऱ्या आरोपींचे मुंडके छाटले पाहिजे असेही आमदार कर्डिले यांनी सांगितले. तुमची मत तुमच्याजवळच ठेवा. आम्हाला तुमच्या मतांची भीक नको. अशा स्पष्ट शब्दात आमदार कर्डिले यांनी सुनावले. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनामागे राजकारण असल्याचा आरोप काहींकडून केला जात असल्याचे सांगत आ. कर्डिले यांनी हा आरोप फेटाळून लावला. हे कुठलेही राजकारण नाही. तुम्हाला जर वाटत असेल की हे राजकारणासाठी सुरू आहे तर तुमचे मत तुमच्याजवळच ठेवा.

# शहाजी राजेभोसले यांचे उपोषण पाचव्या दिवशी मागे

## नान्नज ग्रामस्थांचा गावबंद, महिलांचा कँडल मार्च अन् रास्तारोको आंदोलन ठरले लक्षवेधी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** नान्नज गावातील प्रलंबित प्रश्नांसाठी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शहाजी राजेभोसले यांनी सुरू केलेले आमरण उपोषण प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर अखेर पाचव्या दिवशी मागे घेण्यात आले. या उपोषणाला नान्नज ग्रामस्थांनीही मोठा पाठिंबा देत गावबंद, महिलांचा कँडल मार्च तसेच रास्तारोको आंदोलन केले. त्यामुळे शहाजी राजेभोसले यांचे हे उपोषण विशेष लक्षवेधी ठरले.




जामखेड तालुक्यातील नान्नज गावातील विविध प्रलंबित प्रश्नांसाठी शहाजी राजेभोसले यांनी ७ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू केले होते. मंगळवारी उपोषणाचा पाचवा दिवस होता. नान्नज परिसरात आवश्यक नागरी सुविधांचा अभाव असून रस्त्यांचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थ, महिला तसेच विद्यार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नान्नज येथे सुसज्ज नवीन बसस्थानक उभारणे ही प्रमुख मागणी असून, या बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह तसेच नागरिकांसाठी आसनव्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी आहे. तसेच नान्नज येथे राष्ट्रीयकृत बँकेची शाखा सुरू करण्यात यावी, यासह विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणाला विविध सामाजिक संघटनांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दिला. ग्रामस्थांच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी नान्नज गावात गावबंद पुकारण्यात आला होता. या बंदला व्यापारी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानंतर सायंकाळी गावातील महिलांच्या वतीने कँडल मार्च काढण्यात आला. या कँडल मार्चमध्ये महिलांसोबतच शालेय विद्यार्थिनीही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी नान्नज येथील जामखेड-कर्माळा मार्गावर ग्रामस्थांच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष नान्नजच्या प्रलंबित प्रश्नांकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, मंगळवारी दुपारी प्रशासनाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे व मंडळ अधिकारी इकडे मॅडम यांच्या मध्यस्थीने शहाजी राजेभोसले यांच्याशी चर्चा करण्यात आली. प्रशासनाने विविध मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर अखेर शहाजी राजेभोसले यांनी आपले उपोषण मागे घेतले. या उपोषणास सुनील साळवे, राहुल उगले, भरत मोहळकर, भुजंग दळवी, इन्नुसभाई पठाण, अंकुश मोहळकर, अजय राजपूत, पोपट क्षीरसागर, अस्लम शेख, नितीन पाद्रे, नागनाथ मोहळकर, अमर चाऊस, सतीश साळवे व राखा गोरे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दिला.

# मल्लिकार्जुनेश्वर सोसायटीच्या चेअरमनपदी रुपाली क्षीरसागर बिनविरोध



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील घोटण येथील श्री मल्लिकार्जुनेश्वर विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी रुपाली संजय क्षीरसागर यांची बिनविरोध निवड झाली असून, या निवडीला स्थानिक राजकीय तसेच सहकारी आर्थिक क्षेत्रात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यमान चेअरमन कारभारी थोरात यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते रुपाली क्षीरसागर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांवर आणि ग्रामीण अर्थकारणावर प्रभाव टाकणाऱ्या या पदासाठी कोणतीही निवडणूक न होता एकमताने निर्णय झाल्याने, ही निवड राजकीय समन्वय आणि आर्थिक स्थैर्याचे प्रतीक मानली जात आहे. चेअरमनपदाच्या निवडीसाठी प्रा. दादासाहेब ज्योतिक यांनी सूचक तर लक्ष्मण टाकळकर यांनी अनुमोदक म्हणून भूमिका बजावली.

या निवडीमुळे सोसायटीच्या आर्थिक व्यवहारांना आणि विकासकामांना नवी दिशा मिळेल, तसेच स्थानिक राजकीय समीकरणांवरही परिणाम होईल, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. उपस्थित संचालक व मान्यवरांनी नवनिर्वाचित चेअरमन रुपाली क्षीरसागर यांचे अभिनंदन केले. यावेळी लक्ष्मण टाकळकर, मदन मोटकर, संजय टाकळकर, विठ्ठलराव घुगे, मधुकरराव गोरे, भगवानराव विघ्ने, अशोक भोसले मेजर, भारत मोटकर, सरपंच सुधीर पवार, कुंडलिक घुगे, तसेच विविध पदाधिकारी, माजी चेअरमन, संचालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुपाली क्षीरसागर यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या आर्थिक कारभारात पारदर्शकता व गती येईल, तसेच ग्रामीण सहकारी अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. उपस्थित सर्वांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
बुधवार दि.१२ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## उसने पैसे परत मागितल्याने महिलेला मारहाण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : दवाखान्याच्या उपचारासाठी दिलेले उसने पैसे परत मागितल्याच्या कारणावरून एका महिलेला अश्लील व अपशब्द शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द येथे घडली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खडांबे येथील राहुरी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी महिलेच्या पतीने दवाखान्याच्या कामासाठी सरताज बिबन पठाण (रा. खडांबे खुर्द) याला उसने पैसे दिले होते. सदर पैसे परत देण्याबाबत विचारणा केल्याने आरोपीने फिर्यादीशी वाद घालत तिला अश्लील व अपशब्द शिवीगाळ केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अशोक झिने हे करत आहे.

## पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणीची आत्महत्या

### आळेफाट्यातील सह्याद्री अॅकॅडमीच्या प्रशिक्षकाला अटक



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा** : पोलीस दलात भरती होऊन खाकी वर्दीचे स्वप्न पाहणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणीने प्रशिक्षकाच्या अपमानास्पद वागणुकीला आणि सततच्या मानसिक छळाला कंटाळून गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना आळेफाटा येथे घडली. भाग्यश्री भास्कर भंडारी (वय २४, मूळ रा. आळकुटी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) असे मृत तरुणीचे नाव आहे. या प्रकरणी आळेफाटा पोलिसांनी त्वरित कारवाई करत सह्याद्री अॅकॅडमीचा प्रशिक्षक मयुर अशोक डुंबरे (रा. खामुंडी, ता. जुन्नर) याच्याविरुद्ध आत्महत्यूस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. भाग्यश्री भंडारी ही गेल्या एका वर्षापासून आळेफाटा येथील 'सह्याद्री अॅकॅडमी'मध्ये पोलीस भरतीची पूर्वतयारी करत होती. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी एका वादाच्या प्रकरणात भाग्यश्रीमुळे प्रशिक्षक मयुर डुंबरे याला पोलीस ठाण्यात जावे लागले होते. याच गोष्टीचा राग मनात धरून डुंबरे तिच्यावर खार खाऊन होता. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी मैदानी सरावाला भाग्यश्री इतर काही मुलांसोबत गैरहजर राहिली होती. याच कारणावरून सोमवारी वर्गात सर्व विद्यार्थ्यांसमक्ष प्रशिक्षक मयुर डुंबरे याने भाग्यश्रीला उभे करून तिच्या वैयक्तिक बाबींवरून अत्यंत अपमानास्पद आणि बोचऱ्या शब्दांत सुनावले.

### अपमानाचा घोट आणि टोकाचे पाऊल

वर्गात सर्वांसमोर झालेला हा अपमान आणि सतत होणारा मानसिक छळ सहन न झाल्याने भाग्यश्री प्रचंड नैराश्यात गेली. अखेर सोमवारी दुपारच्या सुमारास तिने आळेफाटा येथील आपल्या भाड्याच्या खोलीत ओढणीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली.

### बहिणीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत भाग्यश्रीची बहीण शितल भास्कर भंडारी (रा. घाटकोपर, मुंबई) हिने आळेफाटा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून प्रशिक्षक मयुर डुंबरे याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## निमगाव जाळीत तीन घरांवर चोरट्यांचा डल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी / आश्वी** : संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी (गोरक्षवाडी) येथे मंगळवारी (दि. ११ ऑगस्ट) पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी तीन घरांमध्ये जबरी चोरी केल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमोल मच्छिंद्र आरगडे यांच्या घराच्या मागील दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील पेटी उचलून चोरटे ती घराजवळील गिन्नी गवत असलेल्या शेतात घेऊन गेले. तेथे पेटी फोडून त्यातील सुमारे दोन तोळे सोन्याचे दागिने आणि एक लाख दहा हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याचे समोर आले आहे. याच परिसरातील संदेश बाळासाहेब चोपडे आणि विलास वादक यांच्या घरातही चोरी झाल्याची माहिती मिळाली आहे. या दोन्ही घरांमधून नेमका किती ऐवज चोरीला गेला, याबाबत पंचनामा पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट होणार आहे. घटनेची माहिती मिळताच आश्वी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर शिरसाठ यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी श्वानपथकाला पाचारण करण्यात आले असून, पंचनामा व पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे. अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर शिरसाठ यांनी सांगितले. पुढील तपास त्यांच्या मार्गदर्शनाखाली आश्वी पोलीस ठाण्याचे कर्मचारी करीत आहेत.

## झरेकाठीत बिबट्याचा धुमाकूळ; दोन शेळ्या ठार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी परिसरात बिबट्याने पुन्हा हल्ला करून दोन शेळ्या ठार केल्याची घटना मंगळवारी (दि.११ ऑगस्ट) पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.झरेकाठी येथील गट क्रमांक ११३ मध्ये सिद्धार्थ आबासाहेब वाणी यांच्या मालकीच्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात दोन शेळ्या ठार झाल्या. घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे यांनी संगमनेर वनपरिक्षेत्र अधिकारी (भाग-३) दिलीप जिरे यांना दिली. त्यानंतर वनरक्षक रामेश्वर हरिभाऊ मंडपे, वनपाल सुजित मारुती बोकडे, वनसेवक उत्तम भुसारी, वनसेवक नजीर शेख तसेच सामाजिक कार्यकर्ते वरुण वाणी यांनी घटनास्थळी दाखल होत मृत शेळ्यांचा पंचनामा केला. दरम्यान, झरेकाठी परिसरात यापूर्वीही बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी पहाटे पाचच्या सुमारास संपत गेनू वाणी यांच्या गट क्रमांक १८२ मधील राहत्या घराजवळ बिबट्याने शेळीवर हल्ला करून तिला जखमी केले होते. त्याच परिसरात बाजीराव वाणी यांच्या एका शेळीवर हल्ला करून बिबट्याने तिला ठार केले होते. तसेच संदीप वाणी यांच्यावरही बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली आहे. एकामागून एक घडणाऱ्या या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. वन विभागाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन परिसरात ड्रोन कॅमेऱ्याच्या माध्यमातून बिबट्याचा शोध घ्यावा आणि त्याला तातडीने जेरबंद करावे. तसेच बिबट्याच्या हल्ल्यात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई लवकरात लवकर मिळावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे यांनी केली आहे.

## पूर्ववैमनस्यातून तरुणावर जीवघेणा हल्ला, आठ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : पूर्वीच्या भांडणाच्या कारणावरून नेवासा खुर्द येथील काटे महाराज कमानीजवळ एका तरुणावर तलवार, चॉपर, लोखंडी रॉड, लाकडी दांडे व दगडांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना सोमवारी (दि. १०) रात्री पावणे दहाच्या सुमारास घडली. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात आठ जणांसह अन्य अनोळखी व्यक्तींविरुद्ध खुनाचा प्रयत्न व दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आसिफ शेरु शेख (वय ४०, रा. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा भाऊ जमील शेरु शेख तसेच त्याचे मित्र सोहेल हरुण शेख व सादिक हमीद शेख हे दुकान बंद करून घरी जात असताना काटे महाराज आश्रम कमानीसमोर आरोपींनी त्यांची वाट अडवली.

अल्टो कार व मोपेडवरून आलेल्या आरोपींच्या हातात तलवार, चॉपर, लोखंडी रॉड, लाकडी दांडे व दगड होते. मागील भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी शिवीगाळ करत तिघांवर हल्ला केला. या मारहाणीत जमील शेरु शेख यांच्यासह त्यांचे दोन्ही मित्र जखमी झाले. जखमींना उपचारासाठी नेवासा फाटा येथील आत्मदीप व साईदीप रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी राम संजय शिरसाठ, लखन संजय शिरसाठ, आदित्य उर्फ पांड्या कनगरे, आरीफ उर्फ बल्ली पठाण, आकाश उर्फ अक्षय चक्रनारायण, अनुज उर्फ याकुब अनिल चांदणे, यश संदिप चांदणे व अन्य चार ते पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम व शस्त्र अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल असून, पुढील तपास नेवासा पोलीस करीत आहेत.

## बिबट्याच्या हल्ल्यात दोन कालवडी ठार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका** : जेऊर पंचक्रोशीतील माळखास शिवारात बिबट्याने गोठ्यात बांधलेल्या दोन कालवडींवर हल्ला करून त्यांना ठार केल्याची घटना सोमवारी (दि. १०) रात्री घडली. शेतकरी तुकाराम बारकू शिंदे यांच्या गट क्रमांक ३६७ मधील गोठ्यात ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जेऊर परिसराला गर्भगिरीच्या डोंगररांगा, वनक्षेत्र तसेच लगतच्या उसाच्या क्षेत्रामुळे बिबट्यांसाठी पोषक अधिवास मिळत आहे. यापूर्वीही चापेवाडी, इमामपूर, गवारे वस्ती, पिंपळगाव माळवी तलाव, धनगरवाडी, डोणी, बहिरवाडी, ससेवाडी, जरे वस्ती, शेटे वस्ती आदी परिसरात बिबट्यांचे दर्शन झाले आहे. पाळीव प्राण्यांवर हल्ल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. बिबट्यांचा वाढता वावर आता पशुधनासोबतच शेतकरी, शेतमजूर व शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

नागरिकांनी रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात जाणे टाळावे, पशुधन सुरक्षित ठिकाणी बांधावे आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. बिबट्या दिसल्यास त्याचा पाठलाग किंवा छेडछाड न करता तातडीने वनविभागाशी संपर्क साधावा, असे वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी आवाहन केले आहे.

## कॉपर केबल चोराला रंगेहात पकडले

### ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी** : कोळगाव शिवारातील पांढरेवाडी परिसरात शेतातील बोरवेल, विहीर व सोलर पंपाच्या कॉपर केबल चोरीचे सत्र सुरू असताना बेलवंडी पोलिसांनी एका संशयित चोरट्याला रंगेहात पकडून अटक केली. उमेश लायसन भोसले (रा. पांढरेवाडी, कोळगाव) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

त्याच्याकडून विविध शेतकऱ्यांच्या सुमारे ८० हजार रुपये किमतीच्या कॉपर केबल जप्त करण्यात आल्या आहेत. पांढरेवाडी येथील शेतकरी अनिल बापूराव मोरे हे ८ ऑगस्ट रोजी दुपारी चारच्या सुमारास कोळगाव शिवारातील गट क्रमांक ८० मधील शेतात काम करीत होते.

त्यावेळी उमेश भोसले हा बोरवेलची कॉपर केबल कापून चोरी करून पळून जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. मोरे यांनी त्याचा पाठलाग करून त्याला रंगेहात पकडले आणि पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता कोळगाव परिसरातील विविध शेतकऱ्यांच्या विहिरी, बोरवेल व सोलर पंपाच्या कॉपर केबल चोरीच्या घटनांची माहिती समोर आली. पोलिसांनी चोरीस गेलेल्या सुमारे ८० हजार रुपयांच्या केबल जप्त केल्या. दरम्यान, पिंपळगाव पिसा, विसापूर व खरातवाडी परिसरातील केबल चोरीच्या घटनांमध्येही आरोपीचा सहभाग आहे का, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## सोनई परिसरात मुरूम तस्करीचा धडाका

### महसूल, पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शनिशिंगणापूर** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात सध्या मुरूम व खडी या गौण खनिजाची मोठ्या प्रमाणात तस्करी सुरू असल्याचा आरोप होत आहे. दिवस-रात्र ट्रॅक्टर, डंपर व डबल ट्रॉलीच्या माध्यमातून मुरूमाची वाहतूक सुरू असून, याकडे महसूल व पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. मुरूम तस्करीबाबत अनेक वेळा संबंधित महसूल व पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेला कारवाईच्या सूचना दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात ठोस कारवाई होत नसल्याने मुरूम तस्करीला आणखी बळ मिळत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे शासनाच्या नैसर्गिक संपत्तीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असून, गौण खनिजाच्या अवैध उत्खननामुळे पर्यावरणावरही परिणाम होत आहे. मुरूम वाहतूक करणाऱ्या काही वाहनांमुळे रस्त्यांवर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. शाळकरी मुले, नागरिक व दुचाकीस्वारांची या मार्गावरून सतत ये-जा सुरू असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, मुरूम तस्करीला विरोध करणाऱ्या नागरिकांना काही तस्करांकडून अरेरावीची भाषा वापरून धमकावले जात असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत.

त्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. सोनई परिसरातील गौण खनिजाची अवैध वाहतूक व उत्खनन तातडीने थांबवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून होत आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशाराही काही सामाजिक संघटनांनी दिला आहे.

### कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

सोनई परिसरातील गौण खनिजाची तस्करी त्वरित थांबवावी. संबंधितांवर कठोर कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तहसील कार्यालयावर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते संजय वैरागर यांनी दिला.

## शासकीय वाळूची चोरी; तिघांना अटक

### हायवा डंपरसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**प्रवरानगर** : शासकीय वाळूची विनापरवाना चोरी करून वाहतूक करणाऱ्या तिघांविरुद्ध लोणी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत अशोक लेलँड कंपनीचा हायवा डंपर व त्यामधील वाळूसह एकूण २० लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३(२), ३(५) तसेच महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायद्यातील कलम ३ व १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास शासकीय परवानगी न घेता वाळूची चोरी करून तिची वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी गोगलगाव ओढा येथे कारवाई करत अशोक लेलंड कंपनीचा पिवळ्या व निळ्या रंगाचा हायवा डंपर (क्र. एमएच १५ केएस ३४२३) ताब्यात घेतला. या प्रकरणात अजय नामदेव कोतकर (वय २३, रा. पिंपळे, ता. संगमनेर), सतीश मारुती सांगळे (वय ३५, रा. पिंपळे, ता. संगमनेर) आणि शरद भाऊसाहेब धुळे (वय ३५, रा. निमोण, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, जप्त केलेल्या डंपरची अंदाजे किंमत २० लाख रुपये, तर त्यामध्ये असलेल्या चार ब्रास वाळूची किंमत ३२ हजार रुपये आहे. प्रत्येक ब्रासची किंमत आठ हजार रुपये प्रमाणे असून, एकूण २० लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. शासकीय वाळूची विनापरवाना चोरी करून पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचा आरोप असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार धाडवड करीत आहेत.

लोणी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि युवराज आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पर्यावरणाची हानी करून होणाऱ्या अवैध वाळू उपशाविरोधात पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

## संत सदगुरु गोदड महाराज केसरीच्या मैदानात सिकंदर शेखने मारली बाजी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कर्जत** : संत सद्गुरु गोदड महाराज ट्रस्ट आयोजित रथोत्सवानिम्मित भरविण्यात आलेल्या कुस्ती मैदानात संत सद्गुरु गोदड महाराज केसरी किताबात महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखने हरियाणाच्या अमित कुमारवर 'छडी टांग' डावावर अस्मान दाखवत मैदान मारले. तर गोदड महाराज केसरीच्या लढतीत ऋषीकेश शेळकेने बाजी मारत सद्गुरु गोदड महाराज केसरीवर आपले नाव कोरले. शेख यास संत सद्गुरु गोदड महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष सन्मानित केले.

दादा पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणात कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराजांच्या यात्रेनिमित्त कुस्त्याचा हगामा सोमवारी भरविण्यात आला होता. यात अनेक नामवंत मल्लांनी हजेरी लावत प्रेक्षणीय आणि उत्कंठा वाढविणाऱ्या कुस्त्या केल्या. आक्रमक खेळांस कर्जत नगरीच्या क्रीडा शौकिनांनी देखील प्रोत्साहन दिले. याच कुस्ती प्रेमींच्या प्रोत्साहनावर अनेक मल्लांनी नेत्रदीपक कामगिरी करीत मैदान गाजवले. यात संत सद्गुरु गोदड महाराज केसरी किताबात लक्षवेधी लढत ठरली महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध हरियाणाच्या अमित कुमार बरोबरची. गोदड महाराज ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप पाटील, उपाध्यक्ष प्रवीण घुले, सचिव शशिकांत पाटील यांच्या हस्ते ही लढत लावण्यात आली. यात प्रथमपासूनच सिकंदर शेखने आक्रमक खेळ दाखवत अमितकुमारवर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न केला. दोन-तीन वेळा शेखचे डाव अमितकुमारने देखील पालटवले. मात्र आपल्या अनुभवाच्या जोरावर अवघ्या काही सेकंदातच महाराष्ट्राच्या सिकंदरने हरियाणाच्या अमितकुमार वर 'छडी टांग' डावावर अस्मान प्रमुख आणि लक्षवेधी लढतीत संत सद्गुरु गोदड महाराज केसरीचे मैदान मारले.

यावेळी मैदानात उपस्थित असलेल्या कुस्ती प्रेमीनी सिकंदरला खांद्यावर घेत एकच जल्लोष केला. या मैदान यशस्वीतेसाठी गोदड महाराज ट्रस्टचे खजिनदार बिभीषण खोसे, तानाजी पाटील, रमेश तोरडमल, विश्वजीत पाटील यांच्यासह सचिन घुले, बाळासाहेब वाघ, रणजित नलवडे, प्रवीण ढोकरीकर, नगरसेवक भाऊसाहेब तोरडमल, बापू शेळके, अमोल भगत, अतुल धांडे, भारत म्हस्के, मच्छीन्द्र माने, दादा सुरवसे, महेंद्र धांडे, रावसाहेब धांडे, विकास तोरडमल, पिंटू शेलार, बाळासाहेब तोरडमल, राजू बागवान, इमरान पठाण, रोहित शिंदे, दादासाहेब सपकाळ, विश्वास शिंदे, विक्रम शेटे, कार्तिक तोरडमल, कार्तिक शिंदे, अनिकेत थोरात, सौरभ तोरडमल, संग्राम तोरडमल, यश तोरडमल, प्रणित पाटील, संतोष आखाडे आदींनी विशेष परिश्रम घेतले. कुस्तीचे समालोचन आपल्या बहारदार शैलीत पहाडी आवाजात प्रशांत भागवत यांनी केले.